मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २३८ ■ सोमवार, ११ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# ‘एक वर्षाकरिता सोने खरेदी करू नका’-पंतप्रधान नरेंद्र मोदींचे जनतेला आवाहन

**हैदराबाद-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन वाचविण्याचं आणि एक वर्षाकरिता सोने खरेदी न करण्याचं जनतेला आवाहन केलं. युद्धामुळे निर्माण झालेल्या जागतिक आर्थिक दबाव आणि विस्कळित झालेली पुरवठा साखळीनं दिलासा मिळेल, अशी अपेक्षा पंतप्रधानांनी व्यक्त केली. ते सिकंदाराबादमध्ये परेड ग्राऊंडसवरील सभेत संबोधित करत होते.

पंतप्रधान मोदी म्हणाले, “जगभरातील पुरवठा साखळीवर परिणाम झालेला आहे. त्यामुळे शेजारील देशांमध्येदेखील किमती वाढलेल्या आहेत. कच्च्या तेलाचे दर वाढत असताना त्याचा मोठा बोझा लोकांवर पडू नये, यासाठी केंद्र सरकार काम करत आहे.विविध देशांकडून इंधन घेत पेट्रोल आणि डिझेलच्या समस्येवर मात करू. पण, दीर्घकाळासाठी कच्च्या तेलाचे प्रमाण कमी करायला हवे”.

पुढे पंतप्रधान म्हणाले,” सरकारकडून इलेक्ट्रिक वाहनांचा प्रोत्साहन देण्यात आलं होतं. त्यामुळे रेल्वेकडून वापरात येणाऱ्या डिझेलमध्ये लक्षणीय घट झाली आहे. येत्या काळात पेट्रोल आणि डिझेलच्या



वापरात मोठी घट होणार आहे. त्यामुळे परकीय गंगाजळी वाचण्यासाठी मोठी मदत होणार आहे”.

तर परकीय गंगाजळी वाढेल- आर्थिक आव्हानांवर मात करण्यासाठी लोकांनी सहभाग नोंदवण्याचं पंतप्रधान मोदींनी आवाहन केलं. सण आणि शुभ मुहूर्तावर खरेदी करण्यात येणाऱ्या सोनेखरेदीचे प्रमाण कमी करावे, असे त्यांनी सूचविले.” एका वर्षाकरिता सोने खरेदी करू थांबवू. जर सोने आयात कमी झाली तर परकीय गंगाजळी वाढेल”, असे पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं. एका युरियाच्या बॅगची किंमत अनेक देशांमध्ये 3 हजार रुपयांना आहे. तर सरकारकडून मदत करण्यात येत असल्यानं भारतात अशी युरियाची बॅग 300 रुपयांहून कमी किमतीला आहे.

काँग्रेस आणि बीआरएसवर मोदींची टीका- पंतप्रधान मोदींनी काँग्रेससह बीआरएसवरही जोरदार टीका केली. भाजपानं प्रचंड बहुमतानं पश्चिम बंगालमध्ये सत्ता स्थापन केल्याचं त्यांनी सांगितलं. त्याच पद्धतीचा तेलंगणामधील जनतेत उत्साह आहे. त्यामुळे तेलंगणामध्ये भाजपा स्थापन करेल, असा त्यांनी विश्वास व्यक्त केला. पंतप्रधान मोदी म्हणाले,” पश्चिम बंगालमध्ये लोकांनी एकाधिकारशाहीची रचना नाकारली. कुटुंबाकडून सुरू असलेलं पक्षाचं राजकारण असू नये, असे देशभरातील लोकांना वाटत असल्याचं त्यांनी नमूद केलं. काँग्रेस आणि बीआरएस हे कुटुंबाकडून चालवित असलेले पक्ष आहेत. तर एनडीए सरकार हे तेलंगणाच्या विकासासाठी कटिबद्ध होतं, असेही पंतप्रधानांनी म्हटलं. देशभरात भाजपाचे केवळ दोन खासदार असताना तेलंगणातून भाजपाचा एक खासदार होता, अशी त्यांनी आठवणही सांगितली. यावेळी पंतप्रधानांनी झहीराबाद इंडस्ट्रियल कॉरिऑडर तेलंगणासाठी मंजूर केल्याचं जाहीर केलं. तसेच तेलंगणाला पीएम मित्र टेक्सटाईल्स पार्क मंजूर केल्याचंही त्यांनी सांगितलं.

आपल्याकडंही कमतरता होऊ शकते- महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये माध्यमांशी बोलताना पंतप्रधानांच्या आवाहनावर प्रतिक्रिया दिली. त्यांनी म्हटलं,” पंतप्रधान मोदी यांनी योग्य सांगितलं आहे. अमेरिका, इस्राईल आणि इराक युद्धामुळे जगात तेल आणि गॅसची कमतरता आहे. जगातील अनेक देशांमध्ये लॉकडाऊन आहे. पाकिस्तानमध्ये पेट्रोलचा भाव 450 रुपये लिटर आहे. पंतप्रधान मोदींमुळे देशात पेट्रोल आणि गॅस उपलब्ध होत आहे. त्याचा नाश केल्यास आपल्याकडंही कमतरता होऊ शकते. त्यामुळे आवश्यकतेनुसार त्याचा वापर उपयोग करावा, असे आमचं आवाहन आहे”.

## अंध गिर्यारोहकाकडून माऊंट एव्हरेस्ट बेस कॅम्प सर

**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या जल अभियंता विभागात पर्यवेक्षक पदावर कार्यरत असलेल्या अजय लालवानी या अंध गिर्यारोहकाने जिद्द, कठोर मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर नुकताच माऊंट एव्हरेस्ट बेस कॅम्प सर केला. अजय यांनी १८ एप्रिल ते १ मे दरम्यान अवघ्या १० दिवसांमध्ये तब्बल ५३६४ मीटर उंचीवरील एव्हरेस्ट बेस कॅम्प सर केला. या कामगिरीबद्दल त्यांचे कौतुक होत आहे. मुंबईकरांची तहान भागविणाऱ्या जल अभियंता विभागात अजय काम करतात. अजय लालवानी यांना गिर्यारोहणाबरोबरच सायकलिंगचीही प्रचंड आवड असून त्यांनी सायकलवरून मुंबई – काश्मीर – कन्याकुमारी – मुंबई असा सुमारे ७५०० किलोमीटर प्रवास ४५ दिवसांमध्ये पूर्ण केला आहे. काश्मीर ते कन्याकुमारी हा ३,८०० किलोमीटरचा प्रवास त्यांनी नऊ दिवस १२ तास आणि ४ मिनिटांत पूर्ण करून उल्लेखनीय विक्रम केला.




त्यामुळे ते जागतिक विक्रमाचा मानकरी ठरले. गिर्यारोहण, सायकलिंगबरोबरच त्यांना ज्युडो, ट्रायथलॉन, मल्लखांब या क्रीडा प्रकारांचीही आवड आहे.अजय आंतरराष्ट्रीय स्तरावरील ज्युडो खेळाडू असून त्यांनी ट्रायथलॉन स्पर्धाही पूर्ण केली आहे. पॅरिस ऑलिम्पिकमधील मल्लखांबच्या प्रात्यक्षिकात त्यांनी देशाचे प्रतिनिधीत्वही केले होते.त्याचबरोबर महाराष्ट्रातील २८५ हून अधिक गड-किल्ल्यांच्या मोहिमाही त्याने पूर्ण केल्या. हिमालयातील चार ठिकाणी त्याने गिर्यारोहणही केले.

## “मृत्यूच्या दारातून महिलेला खेचून आणलं!”

### कळंबोली पोलिसांच्या धाडसी कामगिरीला सलाम; बीट मार्शलने तलावात उडी मारून वाचवला महिलेचा जीव

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/कळंबोली :** कळंबोली परिसरात आज एक थरारक घटना घडली असून, पोलिसांच्या सतर्कता आणि धाडसामुळे एका महिलेचा जीव वाचला आहे. रोडपाली येथील गणपती विसर्जन तलावात एका महिलेने आत्महत्येच्या उद्देशाने उडी मारल्याची माहिती कंट्रोल रूममार्फत मिळताच कळंबोली पोलीस ठाण्याचे बीट मार्शल तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

आज दिनांक १० मे २०२६ रोजी दुपारी १२:३० वाजण्याच्या सुमारास बीट मार्शल १ च्या एम.डी. टी. वर संदेश प्राप्त झाला की, रोडपाली



गणपती विसर्जन तलावात एक महिला बुडत असून तातडीने पोलिस मदतीची आवश्यकता आहे.

सदर माहिती मिळताच पोलीस शिपाई क्रमांक १२३३६ आकाश वानखेडे आणि पोलीस शिपाई क्रमांक ४३४९ सागर माळी हे अवघ्या काही मिनिटांत घटनास्थळी पोहोचले. तलावात महिला बुडत असल्याचे लक्षात येताच पोलीस शिपाई सागर माळी यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता थेट पाण्यात उडी घेतली आणि महिलेला सुखरूप बाहेर काढले. यानंतर संबंधित महिलेला तात्काळ आशा हॉस्पिटल येथे पोलिस वाहनातून उपचारासाठी दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी करून महिलेची प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले. पुढील उपचारासाठी महिलेला एमजीएम हॉस्पिटल येथे रवाना करण्यात आले आहे.सदर महिलेचे नाव अनिता बालाजी नांदे (वय ३५, रा. कळंबोली) असे असून ती काहीशी मनोरुग्ण असल्याची माहिती समोर आली आहे. या धाडसी आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या कामगिरीमुळे कळंबोली पोलिसांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. विशेषतः पोलीस शिपाई सागर माळी यांच्या धाडसाला नागरिकांकडून सलाम केला जात आहे.“पोलिसांचा देवदूत अवतार! तलावात उडी मारून महिलेला दिलं जीवदान”

## सिल्लोड तालुक्यावर शोककळा; धानोरा येथे विहीर खचून बापलेकांसह तिघांचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर** : विहिरीतील नादुरुस्त विद्युत मोटार पाहण्यासाठी खाली उतरलेल्या बापलेकांच्या अंगावर अचानक मातीचा ढिगारा आणि विहिरीचे कडे कोसळल्याने तिघांचाही जागीच मृत्यू झाला. ही हृदयद्रावक दुर्घटना सिल्लोड तालुक्यातील धानोरा येथे शनिवारी (दि. ९) रात्री ९:३० वाजेच्या सुमारास घडली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.

बाजीराव सर्जेराव काकडे (वय ४९, वडील), श्याम बाजीराव काकडे (वय २२) आणि अजिनाथ बाजीराव काकडे



(वय २६, सर्व रा. धानोरा, ता. सिल्लोड) अशी मृतांची नावे आहेत.

धानोरा शिवारातील शेतात काकडे कुटुंबाचे गेल्या महिनाभरापासून विहीर खोदण्याचे काम सुरू होते. ५० फूट खोल गेलेल्या या विहिरीत पूर्णतः मातीचा थर असल्याने सुरक्षिततेसाठी सिमेंटचे कडे टाकण्याचे काम प्रगतीपथावर होते. आतापर्यंत १४ कडे टाकण्यात आले होते. विहिरीतील पाणी उपसा करणारी मोटार तांत्रिक बिघाडामुळे बंद पडल्याने, तो बिघाड पाहण्यासाठी बाजीराव काकडे हे आपल्या दोन मुलांसह शनिवारी रात्री ९:३० वाजता विहिरीत उतरले होते. ते विहिरीच्या तळाला असतानाच अचानक वरून २५ फूट मातीचा ढिगारा आणि १४ कडे त्यांच्या अंगावर कोसळले. तिघेही ढिगाऱ्याखाली गाडले गेल्याने त्यांचा जागीच अंत झाला.

अशी उघडकीस आली घटना

रात्री उशिरापर्यंत तिघेही घरी न परतल्याने बाजीराव यांच्या पत्नी मीराबाई यांनी विहिरीकडे धाव घेतली असता हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. ग्रामस्थांनी तातडीने प्रशासनाला माहिती दिली. रात्री १ वाजेपासून दोन जेसीबी आणि दोन पोकलेंडच्या साहाय्याने बचावकार्य राबवण्यात आले. रविवारी सकाळी ७ वाजेच्या सुमारास तिघांचेही मृतदेह बाहेर काढण्यात आले. सिल्लोड येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन केल्यानंतर रविवारी सकाळी ११:३० वाजता धानोरा येथे शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले.

**कुटुंबाचा आधार हरपला!**

बाजीराव काकडे यांच्या पश्चात पत्नी, मुलगी आणि सून असा परिवार आहे. मोठा मुलगा अजिनाथ हा विवाहित असून त्याच्या मागे पत्नी व मुलगी आहे, तर धाकटा मुलगा श्याम हा अविवाहित होता. एकाच वेळी कुटुंबातील तिन्ही कर्ते पुरुष काळाच्या पडद्याआड गेल्याने काकडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर

## देवणीत नदीपात्रातील गाळाचा उपसा करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : देवणी शहरातील नदीपात्रालगत राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असून, पूरस्थितीमुळे जीवितास धोका निर्माण होत असल्याने संबंधित कुटुंबांचे तातडीने पुनर्वसन करून शासकीय जागेचे वाटप करण्यात यावे, अशी मागणी देवणी येथील सामाजिक कार्यकर्ते श्रावण रावळे यांनी जिल्हाधिकारी लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सदर निवेदनात म्हटले आहे की, देवणी शहरालगत वाहणाऱ्या नदीच्या पात्रात अनेक ठिकाणी गाळ साचल्याने पाण्याचा प्रवाह अडथळित होत आहे. त्यामुळे पावसाळ्यात नदीला पूर येऊन पाणी नागरिकांच्या घरात शिरत असून जीवित व मालमत्तेचा धोका वाढला आहे. गाळाचा उपसा करावे. तसेच, देवणी शहरातील



गावठाण परिसरातील काही नागरिकांना घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत यापूर्वीही शासन दरबारी मागणी करण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र अद्यापही संबंधितांना जागा वाटपाची कार्यवाही न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर नदीपात्रालगत राहणाऱ्या कुटुंबांचे संबंधित प्रश्नाकडे जिल्हा प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षाही

## सामाजिक कार्याची दखल; शांताराम गणेश खुडे यांना “महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६” जाहीर

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** : शिर्डी येथे “बी द चेंज फाउंडेशन” तर्फे आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार सोहळा- २०२६ मध्ये सामाजिक कार्यकर्ते शांताराम गणेश खुडे यांची प्रतिष्ठित “महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार” साठी निवड करण्यात आली आहे. रविवार दिनांक १७ मे रोजी मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. शांताराम खुडे यांनी समाजासाठी केलेले उल्लेखनीय कार्य, निःस्वार्थ सेवा, सामाजिक प्रश्नांवर सातत्याने घेतलेली भूमिका तसेच सर्वसामान्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी केलेल्या संघर्षाची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. शांताराम खुडे यांनी विविध आंदोलन, निवेदने आणि जनआंदोलनांच्या माध्यमातून नागरिकांचे



प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचवून अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. सामाजिक बांधिलकी जपत भ्रष्टाचारविरोधात ही त्यांनी सातत्याने आवाज उठवला. शांताराम खुडे यांनी राष्ट्रीय अध्यक्ष चंद्रकांत उदगुडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या माध्यमातून काही भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई होऊन त्यांचे निलंबन करण्यात आले, तर शहर विकासाच्या कामांमध्ये अनियमितता करणाऱ्या काही कंत्राटदारावर ही कारवाई करण्यात यश मिळाले. त्यांच्या या धाडसी आणि जनहिताच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक परिवर्तनाची नवी दिशा निर्माण होत असून, अनेक तरुणांसाठी ते प्रेरणास्थान ठरत आहेत.

या पूर्वीही विविध सामाजिक संस्थांकडून शांताराम खुडे यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर प्रतिक्रिया देताना त्यांनी सांगितले की, “समाजासाठी केलेल्या कामाची खरी पोचपावती ही समाजाकडून मिळणारा सन्मान असतो.

मला मिळालेला हा पुरस्कार माझ्यासाठी अभिमानाचा क्षण असून, या साठी "बी द चेंज" फाउंडेशनचे आयोजक व संपूर्ण टीमचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

## वैनतेय विद्यालयाचा एसएससी निकाल ९१ .८० टक्के उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ; युक्ता काळे प्रथम

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : निफाड येथील वैनतेय विद्यालय या विद्यालयाचा महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या एसएससी परीक्षेचा निकाल यंदा ९१.८० टक्के लागला असून विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांच्या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या विद्यालयातून इयत्ता दहावीच्या परीक्षेसाठी एकूण ३६६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ३३६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यामध्ये ११४ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य, १०७ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, ८२ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी तर ३३ विद्यार्थ्यांनी तृतीय श्रेणीत यश संपादन केले.

विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये युक्ता भाऊसाहेब काळे हिने ९५ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. प्रणव ज्ञानेश्वर शिंदे व आराध्या रवींद्र कुंदे यांनी प्रत्येकी ९४.६० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला. तेजश्री राहुल शेळके हिने ९३.२० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक, मधुरा मनोजकुमार जाधव हिने ९२.६० टक्के गुणांसह चतुर्थ क्रमांक पटकावला. तसेच समीक्षा विनोद धुमाळ व अमरीन अफसर सय्यद यांनी प्रत्येकी ९१.२० टक्के गुण मिळवत पाचवा क्रमांक मिळविला.

यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे, संस्थेचे विश्वस्त रतन




पाटील वडघुले, किरण कापसे, राजेंद्र राठी, ॲड. दिलीप वाघवकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत, विश्वास कराड, नरेंद्र नांदे यांनी अभिनंदन केले. तसेच विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी, उपप्राचार्य सुभाष खाटेकर, पर्यवेक्षक बी. बी. गुंजाळ व पर्यवेक्षिका श्रीमती आर. एम. लाहोटी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मोहपा येथे शेतकऱ्याच्या लग्नाची वरात बैलगाडीवरून निघाल्याने परिसरात आकर्षण

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : आधुनिकतेच्या युगात पारंपरिक संस्कृतीचे जतन करत सवंद्री येथील शेतकरी श्री. लोचन भास्कर जुनघरे यांच्या विवाह सोहळ्याची वरात दिनांक 07/05/2026 रोजी मोहपा येथे पारंपरिक बैलगाडीवरून



काढण्यात आली.विशेष म्हणजे सजविलेल्या बैलगाडीतून निघालेली वरात पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. पारंपरिक व ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या या अनोख्या वरातीमुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

## तनुश्री बाजडचे घवघवीत सुयश

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रिसोड रणजितसिह.. ठाकूर :** रिसोड तालुक्यातील एकमेव मुलीची शाळा असलेल्या भारत माध्यमिक कन्या शाळेचा निकाल नुकताच जाहीर झाला, इयत्ता दहावीच्या परीक्षेमध्ये विशेष वर्ग ड मधून 94% घेऊन तनुश्री गजानन बाजड राहणार केशवनगर ही प्रथम क्रमांक घेऊन उत्तीर्ण झाली. इयत्ता सहावी मध्ये भारत माध्यमिक कन्या शाळेत दाखल झालेली तनुश्री गजानन बाजड ही सहावीपासून ते दहावीपर्यंत प्रथम क्रमांकात चांगल्या टक्क्याने प्रथमच राहिली क्रमांक घेत चांगल्याप्रकारे शैक्षणिक प्रवास करत तिने दहावीपर्यंतचा उत्कृष्ट प्रवास घडवला विशेष म्हणजे निवड चाचणीमध्ये विद्यार्थी निवड चाचणीत *विशेष वर्ग* निवडीसाठी नेहमीसाठी प्रथम असायचीविशेष



म्हणजे तनुश्री गजानन बाजड हिला रिसोड मधील कुठल्याही प्रकारच्या खाजगी शिकवणी वर्गात अर्थात टिव्हिशन नव्हते ,तिने स्वतः अभ्यास करून सेल्फ स्टडीच्या जोरावर अभ्यास करून प्रथम क्रमांक घेत नाव उज्वल केले तिने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प्रथम क्रमांक मिळवण्याची परंपरा कायम राखली यावेळी सर्व स्तरातून तनुश्री गजानन बाजड हिचे कौतुक होत आहे यावेळी तिने स्पर्धा परीक्षेतून उज्वल भविष्य घडविणार असल्याचे प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना म्हटले आहे या यशाचे श्रेय तिने भारत माध्यमिक कन्या शाळेच्या प्राचार्य मंजुषाताई देशमुख मॅडम,पर्यवेक्षक सुनील डहाळके सर, वर्ग शिक्षक बुंधे सर, आनंद भावसार सर व आई वडील यांना दिले.

### पुर्णा नदीपात्रातील वाळू घाटांची ईटीएस मोजणी उशिराने का?

# आदेशानंतर तीन आठवड्यांनी मोजणी सुरू; जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश डावलून पोकलेनने वाळू उपसा सुरूच!

**दैनिक युवक आधार**
**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे** : मंठा तालुक्यातील पुर्णा नदीपात्रातील लिलाव झालेल्या वाळू घाटांवरील अनियमिततेच्या तक्रारींनंतर अखेर ईटीएस (इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन) मोजणीला सुरुवात झाली असली, तरी वरिष्ठांच्या आदेशानंतर तब्बल तीन आठवड्यांनी ही प्रक्रिया सुरू झाल्याने महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, मोजणीची प्रक्रिया सुरू असतानाही अनेक घाटांवर पोकलेन व जेसीबीच्या साहाय्याने वाळू उपसा सुरू असल्याने जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशांची अंमलबजावणी होते की नाही, याबाबतही शंका व्यक्त केली जात आहे.

तळणी परिसरातील पुर्णा नदीपात्रातील लिलाव झालेल्या ११ वाळू घाटांपैकी १० घाट उत्खननासाठी संबंधित ठेकेदारांच्या ताब्यात महसूल प्रशासनाने दिले आहेत. पहिल्या टप्प्यात २ फेब्रुवारी रोजी भुवन वाळू घाटावर ४ हजार २४० ब्रास वाळू उत्खननास परवानगी देण्यात आली होती. मात्र, एकाच रॉयल्टीवर दिवसभर 'ॲडजस्टमेंट'च्या नावाखाली



वाहतूक, मंजूर क्षमतेपेक्षा अधिक व क्षेत्राबाहेरील उत्खनन होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत.

देवठाणा–उस्वद क्रमांक १ वाळू घाटावर ५ हजार ३०० ब्रास उत्खननास परवानगी असताना, तलाठ्यांच्या पाहणीत नियमबाह्य आणि अतिरिक्त उत्खनन झाल्याचा अहवाल १० एप्रिल रोजी वरिष्ठांकडे सादर करण्यात आला होता. तसेच मनसेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांच्यासह विविध सामाजिक संघटनांनी जिल्हाधिकारी अशिमा मित्तल आणि उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड यांच्याकडे लेखी पुराव्यांसह तक्रारी दाखल केल्या होत्या.



या तक्रारींची दखल घेत वरिष्ठ स्तरावरून १६ एप्रिल रोजी पुर्णा नदीपात्रातील संबंधित वाळू घाटांची ईटीएस मोजणी करण्याचे आदेश मंठा तहसीलदारांना देण्यात आले होते. मात्र, हे आदेश मिळूनही प्रत्यक्ष मोजणी प्रक्रिया ७ मे रोजी सुरू करण्यात आली. पहिल्या टप्प्यात देवठाणा–उस्वद १ आणि कानडी-लिबखेडा वाळू घाटांची मोजणी करण्यात आली. विशेष म्हणजे, सर्वाधिक तक्रारी असलेल्या भुवन वाळू घाटाची ईटीएस मोजणी यापूर्वीच करण्यात आल्याचे सांगितले जात असले, तरी ती प्रक्रिया पारदर्शक न झाल्याची तक्रार स्थानिकांनी केली आहे.

**ईटीएस मोजणीनंतर प्रत्यक्ष उत्खनन किती, याकडे लक्ष**

पुर्णा नदीपात्रातील खोरवड , देवठाणा , उस्वद, कानडी, लिबखेडा, टाकळखोपा, किर्ला, वाघाळा , भुवन या परिसरातील वाळू घाटांवर सध्या रात्रंदिवस पोकलेन व जेसीबीच्या साहाय्याने वाळू उपसा सुरू असल्याचे चित्र आहे. अनेक ठिकाणी एकाच रॉयल्टीवर दिवसभर वाहतूक केली जात असल्याच्या तक्रारी आहेत, तर काही स्थानिक वाहनधारकांकडून विनारॉयल्टी वाळू वाहतूकही होत असल्याचे बोलले जात आहे.

खोरवड, देवठाणा, उस्वद, हनवतखेडा , कानडी , , पुर्णा पाटी, इंचा, पोखरी केंधळे, भुवन व वझर सरकटे या परिसरात नियमबाह्य उत्खनन व वाहतूक सुरू असल्याचे स्थानिकांचे म्हणणे असून, कारवाई टाळण्यासाठी प्रतिगाडी ५० हजार रुपयांचा हप्ता घेतला जात असल्याच्या चर्चांनाही सोशल मीडियावर उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर सुरू झालेल्या रोहोर यंत्राद्वारे ईटीएस मोजणीतून प्रत्यक्षात किती वाळू उपसा झाला, अतिरिक्त उत्खनन किती झाले आणि जबाबदारांवर कोणती कारवाई होणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# जोगेश्वरी गुंफा महापालिका शाळेसमोरील रस्ता बंद प्रकरणी आमदार अनंत नर यांची पाहणी

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख** : जोगेश्वरी (पूर्व) विधानसभा क्षेत्रातील प्रभाग क्रमांक ७३ मध्ये जोगेश्वरी गुंफा महानगरपालिका शाळेसमोर सुरू असलेल्या विकास कामांमुळे शाळेसमोरील रस्ता बंद करण्यात आल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या प्रकारामुळे शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना, त्यांच्या पालकांना तसेच स्थानिक नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याने परिसरात नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते.

सदर विकास कामांदरम्यान उभारण्यात आलेल्या पत्र्यांच्या संरचनेमुळे आणि खोदकामामुळे शाळेकडे जाणारा मुख्य मार्ग अंशतः बंद झाला होता. परिणामी विद्यार्थ्यांना अरुंद आणि धोकादायक मार्गाने शाळेत जावे लागत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केली. विशेषतः लहान विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण होते.

या प्रकरणाची तात्काळ




दखल घेत आमदार मा. श्री. अनंत (बाळा) नर यांनी संबंधित एसआरए अधिकाऱ्यांसह घटनास्थळी भेट देत पाहणी केली. यावेळी त्यांनी विकास कामांची सद्यस्थिती जाणून घेत संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांशी चर्चा केली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड होणार नाही, याची खबरदारी घेण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

पाहणीदरम्यान आमदार नर यांनी शाळेसमोरील परिसराची प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांच्या अडचणी समजून घेतल्या. "विकासकामे महत्त्वाची असली तरी नागरिकांच्या दैनंदिन जीवनात अडथळे निर्माण होणार नाहीत, याची काळजी घेणे आवश्यक आहे. विशेषतः विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत कोणतीही निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही," असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

तसेच काम सुरू असलेल्या ठिकाणी सुरक्षित पर्यायी मार्गाची व्यवस्था करणे, आवश्यक सूचना फलक लावणे, धोकादायक भाग सुरक्षित करणे आणि वाहतुकीस अडथळा होणार नाही यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले. भविष्यात अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने कामे करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी एसआरए अधिकारी, स्थानिक पदाधिकारी, नागरिक आणि परिसरातील रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार अनंत नर यांनी घेतलेल्या तातडीच्या भूमिकेमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत.

# माणिकराव पालोदकर इंग्लिश स्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के

### मुलींची यशस्वी घोडदौड; उज्ज्वल परंपरा कायम

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या एस.एस.सी. बोर्ड परीक्षा मार्च २०२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून, सिल्लोड येथील माणिकराव पालोदकर इंग्लिश स्कूलने १०० टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा यंदाही कायम राखत यशाचा मानाचा तुरा रोवला आहे.

यावर्षीच्या निकालात विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत संपूर्ण निकालात बाजी मारली. शाळेची विद्यार्थिनी कु. खुशी बाळू आरके हिने ९०.८०% गुण मिळवून प्रथम क्रमांक, कु. भक्ती विनायक कुदळ हिने ९०.६०% गुणांसह द्वितीय क्रमांक, तर कु. कल्याणी गणेश चोपडे हिने ८९.२०% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला.

या परीक्षेत शाळेतील १६ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले असून, २ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा लौकिक अधिक अधोरेखित झाला आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल राजर्षी शाहू शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रभाकरराव पालोदकर, सचिव डॉ. राहुल पालोदकर, संचालिका डॉ. रुपाली पालोदकर, प्राचार्य डॉ. अशोक पंडित, मुख्याध्यापिका तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## हरिहरेश्वर माध्यमिक विद्यालय हरेश्वर च्या कुमारी संस्कृती कोलथरकर हिने ८६ .८०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित :** देवभूमी हरिहरेश्वर दक्षिण काशी स्थित हरिहरेश्वर माध्यमिक विद्यालय हरेश्वर च्या इयत्ता १० वी चा. ९६ % निकाल भेंडखोल , च्या कुमारी संस्कृती श्रुती राजकुमार कोलथरकर या विद्यार्थिनीने सेमी इंग्रजी मधून ८६.८०% गुण मिळवून प्रथम क्रमांक ची मानकरी ठरली आहे. शाळेमधील सर्व मान्यवर शिक्षक शाळेमध्ये तासाला शिकवलेले अध्ययन, बाहेर कुठेही कोचिंग क्लास न घेता आपल्या स्वतःच्या सर्व आवडी जोपासत स्वतः जिद्दीने, प्रामाणिकपणे अभ्यास करून हे घवघवीत यश संपादन केले आहे. इयत्तापहिली पासून आपल्या पहिल्या नंबरची परंपरा अगदी इयत्ता दहावी मध्ये सुद्धा या मुलीने कायम टिकून ठेवलेली आहे.या गोष्टीचा पंचक्रोशीतील सर्व स्तरातून कौतुक होत आहे. द्वितीय क्रमांक. कुमारी सई राजेश लांगी.६९%तृतीय क्रमांक. कुमारी विभक्ती विकास तेरेकर ६८.८०%शाळेचा एकूण रिझल्ट ९६% लावल्यामुळे शाळेचे मुख्याध्यापक श्री चौधरी सर तुरे सर, मोरे सर, लाड सर, पावशे सर, वारुळे मॅडम, कोलथरकर मॅडम सर्वांचेच संस्थेकडून तसेच सर्व पालक वर्गाकडून खूप खूप कौतुक करत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वाटचाली करता मनःपूर्वक शुभेच्छा देत संस्कृतीचे खूप खूप गोड कौतुक करत आहेत.

# जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी भिवापूर येथील मदत कार्याची केली पाहणी

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** अचानक लागलेल्या आगीने आमचे पूर्ण गाव भयभीत झाले होते. शासन तात्काळ गावात पोहोचले. मदत कार्य वेगात सुरु झाले. झालेल्या घटनेच्या भितीतून आता आम्ही गावकरी पुन्हा विश्वासाने उभे झाले आहोत. घटनेच्या दुसऱ्या दिवशीच जनावरांना चाराही दाखल झाला. पशु वैद्यकीय विभागाची टीम पोहोचली. सकाळपासून पंचनामे सुरु झाले. किराणा साहित्य व जीवनावश्यक साहित्य गावात पोहोचले. शासनासमवेत लोकसहभागाचा प्रत्यय आला. शेजारची मल्हारपूर, खोलडुडा या गावांनी कुटार आणि कडबा पाठवून दिला. शासन तात्काळ मदत करु शकते याचा प्रत्यय आम्ही धामणगाववासीयांनी घेतल्याचे सरपंच वैशाली चौधरी यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज धामणगाव येथे मदत कार्याची पूर्ण पाहणी करुन येथील हनुमान मंदीरात घेतलेल्या आढावा बैठकीत सारे गाव सहभागी झाले होते. या बैठकीस अतिरिक्त



जिल्हाधिकारी प्रविण महिरे, उपविभागीय अधिकारी विद्यासागर चव्हाण, सरपंच वैशालीताई चौधरी, माजी सरपंच योगेश डफरे व इतर अधिकारी उपस्थित होते. शासनातर्फे विविध विभागाच्यावतीने आतापर्यंत नुकसानग्रस्त गावकऱ्यांपर्यंत पोहोचविलेल्या मदतीची माहिती देऊन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी खातरजमा करुन घेतली. आजवर दिलेल्या मदतीसह पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे या मदत कार्यावर लक्ष ठेवून आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण माहिती घेतली असून मुख्यमंत्री साहयता निधीद्वारे वेगळी मदत देत असल्याचे त्यांनी गावकऱ्यांना सांगितले.

या बैठकीत गावकऱ्यांच्या विविध अडचणी ऐकूण घेत त्यांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

शासनाने तत्पर मदत पोहोचविल्याने आता ज्यांची घरे आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. त्यांनी घराचे काम सुरु केले आहे. उषा तायवाडे, शरद राऊत व इतर बाधितांनी आज आपल्या घराचा पाया खोदून प्रारंभ केला. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सतत संपर्क ठेवून प्रशासनासोबत गावाला जोडून ठेवल्याबद्दल सरपंच वैशाली चौधरी यांनी समाधान व्यक्त केले.

**खत व बी-बियाणे पुरवठा सुरळीत ठेवण्याबाबत उपविभागीय अधिकाऱ्यांना निर्देश**

शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या बी-बियाणे व खत निविष्ठांची कमतरता पडू नये याचे काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी उमरेड येथे आढावा बैठकीत दिले. शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी उपविभागीय अधिकारी, तालुका दंडाधिकारी, कृषी अधिकारी यांनी दक्षता घेऊन वेळोवेळी खत विक्रेत्या आस्थापनांना भेटी देऊन पाहणी करण्याचे त्यांनी सांगितले. भिवापूर तालुक्यातील मौजा रानमांगली येथे कृषी भूषण पुरस्कार प्राप्त शेतकरी लक्ष्मण दडमल यांच्या शेतावर त्यांनी भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी शेतात केलेल्या विविध सेंद्रीय शेतीच्या प्रयोगाची माहिती घेऊन विक्री व्यवस्थापन याबाबत चर्चा केली. यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी विजय पाटील, तालुका कृषी अधिकारी कुमारी भोपळे, प्रगतशील शेतकरी विजय वर्मन, आनंदराव दडमल, ज्ञानेश्वर गजबे, किशोर भुडे आदी उपस्थित होते.

## नगरसेवक श्री.बाबाजी पाटील आणि नगरसेविका सौ.अर्चना पाटील यांनी घेतली गुणवंत विद्यार्थ्यांची भेट

**दैनिक युवक आधार**
**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी :** सरस्वती विद्यामंदिर पडलेगाव या शाळेतील कुमारी समीक्षा संजय पवार ८१.८० टक्के,स्नेहल संतोष करडे ८१.८० टक्के, आणि भक्ती फुलाजी पाटील ७६.८० टक्के या तिन्ही विद्यार्थिनींनी दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करून शाळेच्या तसेच आपल्या गावाच्या नावात मानाचा तुरा रोवला आहे या गुणवंत विद्यार्थिनींच्या घरी जाऊन स्थानिक कार्यतत्पर नगरसेवक तसेच ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक श्री. बाबाजी बाळाराम पाटील आणि स्थानिक नगरसेविका सौ. अर्चना निलेश पाटील यांनी भेट घेऊन विद्यार्थिनींशी आणि त्यांच्या कुटुंबांशी संवाद साधून त्यांना शुभेच्छा दिल्या आणि पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रोत्साहन





दिले समाजातील प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती करावी आणि आपले तसेच आपल्या गावाचे, शहराचे, राज्याचे आणि देशाचे नाव मोठे करावे हा संदेश या भेटीदरम्यान श्री. बाबाजी पाटील यांच्याकडून सर्व विद्यार्थ्यांना देण्यात आला.

# वेद प्रभाकर जाधव याची राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड

**दैनिक युवक आधार**
**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : दिंडोरी /_टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र व टेनिस क्रिकेट असोसिएशन नाशिक आयोजित 14 वर्षे आतील राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धा व निवड नाशिक येथील मोदी मैदानावर उत्साह संपन्न झाली अभिनंदन! नाशिक ग्रामीण संघातील वेद प्रभाकर जाधव याची महाराष्ट्र संघात झालेली निवड ही खरोखरच अभिमानास्पद बाब आहे.



राज्य स्तरीय 14 वर्षे आतील स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव सौ मीनाक्षी गिरी , वूमन डायरेक्टर धनश्री गिरी ,महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी व नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड, सहसचिव धनंजय लोखंडे, संदीप बोरसे इत्यादी उपस्थित होते. नाशिक येथे संपन्न झालेल्या १४ वर्षांखालील राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत वेद प्रभाकर जाधव याने अष्टपैलू (All-rounder) कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्याच्या या उत्कृष्ट खेळीच्या जोरावर त्याची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.

वेद जाधवच्या या यशाबद्दल वडिल प्रभाकर जाधव,भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव मीनाक्षी गिरी, वुमन डायरेक्टर धनश्री गिरी, महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी, नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड, सहसचिव धनंजय लोखंडे आणि दिंडोरी तालुका सचिव संदीप बोरसे, प्रशांत आढाव राष्ट्रीय खेळाडू सनी बलसाने सरपंच. प्रभाकर सदाशिव जाधव,उप सरपंच. अरुणा गणेश जाधव

सदस्य. मिथुन गवळी, पोपटराव जाधव, गौतम बागुल, सरला गवळी, अर्चना जाधव, अलका बुवा, सुनिता जाधव, मंगल जाधव, ग्राम विकास अधिकारी. लक्ष्मीकांत ठाकरे. चेअरमन. बाबुराव जाधव व्हा चेअरमन सुनील संदन प्रकाश जाधव, संतोष जाधव, तुकाराम जाधव, कचरू शेळके इत्यादींनी त्याचे अभिनंदन करून भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या सर्व क्रीडा प्रेमींनी त्याचे अभिनंदन केले आहे. राजस्थान येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत वेदने महाराष्ट्रासाठी अशीच चमकदार कामगिरी करावी, यासाठी त्याला खूप खूप शुभेच्छा!

# एरंडोलचे व्यंगचित्रकार शरद महाजन यांचा पुण्यात सन्मान

## उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या हस्ते गौरव

**दैनिक युवक आधार**
**एरंडोल स्वप्निल पाटील विशेष प्रतिनिधी** : जागतिक व्यंगचित्रकार दिनाचे औचित्य साधून कार्टून कंबाईन्स संस्था व युवा संवाद सामाजिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ' पुणे आंतरराष्ट्रीय व्यंगचित्र महोत्सवा ' चे गुरुवारी ७ मे २०२६ रोजी बालगंधर्व कलादालन येथे उत्साहात उद्घाटन झाले. ४२ देशांतील १५० हून अधिक कलाकारांच्या सुमारे ३०० व्यंगचित्रांचे हे प्रदर्शन पुणेकरांसाठी खुले झाले असून, यांद्वारे सामाजिक वास्तवावर मिश्किल आणि टोकदार भाष्य करण्यात आले आहे.

महोत्सवाचे उद्घाटन उबाठा शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे आणि उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी एरंडोल येथील प्रसिद्ध व्यंगचित्रकार शरद महाजन यांचा उपमहापौर वाडेकर यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.याप्रसंगी सकाळ अॅग्रोवनचे



व्यंगचित्रकार लहू काळे ,श्रीपाद पालकर, अरविंद देशपांडे, रवींद्र बाळापुरे, सोमेश्वर गजमल, सिद्धार्थ नागठाणकर, सुहास पालीमकर, आशिष विखार, योगेश चव्हाण,गिरीश पाटील आदींचा व्यंगचित्रकारांचा सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला 'कार्टूनिस्ट्स् कम्बाईन ' चे अध्यक्ष गौरव सर्जेराव, उपाध्यक्ष अमित पापळ, खजिनदार उदय मोहिते, मुख्य समन्वयक किशोर शितोळे, आयोजक धनराज गरड, बाळासाहेब घोंका, शशिकांत कांबळे यांसह कला क्षेत्रातील दिग्गजांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

**"व्यंगचित्रकार हा संवेदनेचा जागत पहारा" – सुषमा अंधारे**

उद्घाटनपर भाषणात सुषमा अंधारे यांनी व्यंगचित्रकारांच्या निष्ठेचे कौतुक केले. त्या म्हणाल्या." व्यंगचित्रकार कमीत कमी शब्दांत आणि मोजक्या रेषांतून मोठा आशय मांडतो. राजाश्रय नसला तरी सत्याची बाजू मांडणारा तो खरा कलाकार असतो. आजच्या डिजिटल युगात पत्रकारिता स्वातंत्र्य आव्हानात्मक असताना व्यंगचित्रकार आपल्या कुंचल्यातून सामाजिक संवेदनशीलता जिवंत ठेवत आहेत."

उपमहापौर परशुराम वाडेकर यांनीही आजच्या काळात ही कला जिवंत ठेवणे काळाची गरज असल्याचे सांगत, व्यंगचित्रांमधील समाज परिवर्तनाची ताकद अधोरेखित केली.

यावेळी 'कार्टूनिस्ट्स् कम्बाईन'चे अध्यक्ष गौरव सर्जेराव यांनी पुण्यात व्यंगचित्रकारांच्या हक्काचे ' व्यंगचित्र भवन ' उभे राहावे, अशी मागणी प्रशासनाकडे केली.सदर व्यंगचित्र प्रदर्शन ७ मे ते ९ मे २०२६ पर्यंत व्यंगचित्रप्रेमींसाठी व रसिकांसाठी सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत खुले राहील.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर गरड यांनी केले, तर आभार प्रदर्शन किशोर शितोळे यांनी मानले. जागतिक स्तरावरील ही कलाकृती पाहण्यासाठी पुणेकर रसिकांनी मोठी गर्दी केली आहे.

# एच ए आर सी संस्थेकडून आंतरराष्ट्रीय मातृदिनानिमित्त निराधार मातेला स्वावलंबनाचा आधार

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार** : आंतरराष्ट्रीय मातृदिनानिमित्त होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटिज (एच ए आर सी), परभणी संस्थेच्या वतीने सेलू तालुक्यातील कुंडी येथील निराधार विधवा माता वंदना बालासाहेब अंभुरे यांना उदरनिर्वाहासाठी शेळी व करडू भेट देऊन स्वावलंबनाचा आधार देण्यात आला.

पतीच्या निधनानंतर दोन लहान मुलांसह अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगणाऱ्या वंदना अंभुरे या मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. आर्थिक अडचणींमुळे मुलांचे शिक्षण आणि दैनंदिन गरजा भागविणे त्यांच्यासाठी मोठे आव्हान ठरत होते. कुंडी येथील मुख्याध्यापक राम गायकवाड यांनी अंभुरे यांच्या परिस्थितीची माहिती संकलित करून एच ए आर सी संस्थेकडे मांडली. त्यानंतर संस्थेने लोकसहभागातून पुढाकार घेत रविवारी (दि.१०) आंतरराष्ट्रीय मातृदिनानिमित्त



त्यांना १ शेळी व १ करडू भेट दिले.

या मदतीमुळे अंभुरे यांना शेळीपालन व्यवसायाच्या माध्यमातून स्वावलंबनाकडे वाटचाल करण्याची नवी संधी उपलब्ध झाली आहे. तसेच कुटुंबाच्या उदरनिर्वाहाबरोबरच मुलांच्या शिक्षणासाठीही आर्थिक हातभार लागणार असल्याची भावना व्यक्त होत आहे. मदत मिळाल्यानंतर अंभुरे यांनी संस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी एच ए आर सी संस्थेचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक, राम गायकवाड व डॉ. शरद ठाकर उपस्थित होते.

**लोकसहभागातून दातृत्व**

या उपक्रमासाठी हार्दिक ठाकर, अंबरेश्वर राठी, आलोक जोशी, विनोद भाला, राम गायकवाड, संतोष बारबिंडे व प्रा. डी. व्ही. दिकीत यांनी आर्थिक सहकार्य केले.

**महिला सक्षमीकरणासाठी सातत्यपूर्ण कार्य**

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी एच ए आर सी संस्था विशेष कार्य करीत असून आजपर्यंत ९२ निराधार, विधवा व गरजू महिलांना शिलाई मशीन, पिठाच्या गिरण्या, शेळी-करडू तसेच इतर उदरनिर्वाहाची साधने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या माध्यमातून अनेक महिलांना स्वावलंबनाचा मार्ग मिळाला असून त्यांच्या कुटुंबांना स्वाभिमानाने जगण्याचा भक्कम आधार प्राप्त झाला आहे. समाजातील गरजू घटकांसाठी संस्थेचे कार्य प्रेरणादायी ठरत आहे.

# लाखनी ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर वेळेवर गैरहजर; रुग्णांची परवड, आरोग्य यंत्रणा मात्र सुस्त

**दैनिक युवक आधार**
**रोशन खोब्रागडे लाखनी** : तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांसाठी आधार मानल्या जाणाऱ्या लाखनी ग्रामीण रुग्णालयातील आरोग्यसेवेचा बोजवारा उडाल्याचे चित्र पुन्हा समोर आले आहे. सकाळच्या कर्तव्याच्या वेळेत अनेकदा डॉक्टर वेळेवर उपस्थित राहत नसल्याने उपचारासाठी दूरदूरून आलेल्या रुग्णांना तासनतास प्रतीक्षा करावी लागत आहे. यामुळे वृद्ध, महिला, लहान मुले आणि गंभीर रुग्णांची मोठी गैरसोय होत असून आरोग्य प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

रुग्णालयात सकाळी ओपीडी सुरू होण्याची वेळ निश्चित असतानाही



काही डॉक्टर उशिराने येत असल्याची व आल्यावर बाहेर फिरत असल्याची तक्रार नागरिकांकडून सातत्याने केली जात आहे. अनेक रुग्ण सकाळपासून रांगेत उभे राहत असतात; मात्र डॉक्टर अनुपस्थित असल्याने तपासणी खोलीबाहेरच गर्दी वाढत जाते. काही रुग्णांना खासगी दवाखान्यांचा पर्याय निवडावा लागत असल्याने आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागत आहे.

ग्रामीण भागातील गरीब व सर्वसामान्य जनतेसाठी शासन कोट्यवधी रुपये खर्च करून आरोग्य सुविधा उपलब्ध करून देत असताना प्रत्यक्षात शिस्तीचा अभाव आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष यामुळे रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.

विशेष म्हणजे, रुग्णालयातील उपस्थिती, सेवा वेळा आणि डॉक्टरांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी यंत्रणा असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. "डॉक्टर वेळेवर येत नसतील तर गरीब रुग्णांनी न्याय कुणाकडे मागायचा?" असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.आरोग्य विभागाने या प्रकाराची तातडीने दखल घेऊन संबंधितांवर कारवाई करावी, डॉक्टरांची वेळेवर उपस्थिती सुनिश्चित करावी आणि ग्रामीण रुग्णालयातील आरोग्यसेवा सुरळीत करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# सणसर येथे दर रविवारी होणाऱ्या गोमांस विक्रीवर बंदीची मागणी

**दैनिक युवक आधार**
**सणसर/ विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील सणसर येथे दर रविवारी मोठा आठवडी बाजार भरतो. या बाजारात गोमांसाची विक्री मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे दिसून येत आहे. विक्री परिसरात दुर्गंधीयुक्त वास पसरत असल्यामुळे नागरिकांमध्ये आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. ताप,खोकला,सर्दी यांसारख्या संसर्गजन्य आजारांनी लोक त्रस्त झाले आहेत गोमांस परिसरात स्वच्छतेचा अभाव असून गोमांस विक्रीमुळे वातावरण दूषित होत असल्याची चर्चा

महिलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वजण करत असून स्थानिक नागरिक आरोग्य समस्यांनी त्रस्त झाले असून गोमांस विक्रीवर तातडीने बंदी घालावी अशी मागणी करण्यात आली आहे नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी ठोस पावले उचलावीत.सणसर येथील आठवडी बाजारात गोमांस विक्रीमुळे निर्माण झालेल्या आरोग्य समस्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.नागरिकांच्या मागणीनुसार गोमांस विक्रीवर बंदी घालून स्वच्छतेची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# पालखेड न्यू इंग्लिश स्कूलचा दहावीचा निकाल 94 .62 टक्के

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : महाराष्ट्र शिक्षण संस्थेच्या पालखेड येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल यंदा 94.62 टक्के लागला असून विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत शैक्षणिक क्षेत्रात पुन्हा एकदा उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल कामगिरीमुळे पालक, शिक्षक व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विद्यालयातून यावर्षी दहावीच्या परीक्षेस एकूण 96 विद्यार्थी प्रविष्ट झाले



होते. त्यापैकी 3 विद्यार्थी गैरहजर राहिले तर 88 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातील प्रथम पाच गुणवंत विद्यार्थ्यांनी विशेष यश संपादन केले असून त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. अक्षदा जगताप हिने 91.60 टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. विना थेटे हिने 88.60 टक्के गुणांसह द्वितीय, नयना आहेर हिने 88.20 टक्के गुणांसह तृतीय, साई शेळके हिने 87.40 टक्के गुणांसह चतुर्थ तर सिद्धेश्वर पवार याने 86.80 टक्के गुणांसह पाचवा क्रमांक मिळविला.

याशिवाय विद्यालयातील 25 विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य श्रेणी, 29 विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, 20 विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी तर 14 विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण श्रेणीत यश मिळविले आहे.

विद्यालयाच्या या उल्लेखनीय निकालाबद्दल संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव जोंधळे, उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे, कार्यकारी संचालक प्रा. दीपक जोंधळे, कार्याध्यक्ष तथा सचिव दत्तात्रेय जोंधळे, स्थानिक स्कूल कमिटीचे उपाध्यक्ष अशोक आहेर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश थेटे, शिक्षक-पालक संघाचे अध्यक्ष विजय आहेर, उपाध्यक्ष रवींद्र कोकाटे, मुख्याध्यापक अशोक शेळके तसेच सर्व कमिटी सदस्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# निफाडमध्ये राष्ट्रीय नाथ संमेलनास भक्तीपूर्ण वातावरणात प्रारंभ

## “नाथ संमेलनातून सत्शिष्य बनून सनाथ होण्याचा प्रयत्न करा” - शंकर भारती

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

नाशिक आणि निफाड ही नाथांची भूमी असून संत ज्ञानेश्वर महाराजांचे गुरू निवृत्तीनाथांची समाधी त्र्यंबकेश्वर येथे आहे. नाथ परंपरेचे विचार समाजात अधिक दृढ करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या नाथ संमेलनातून प्रत्येकाने सत्शिष्य बनण्याचा प्रयत्न करावा. एकत्र येऊन चिंतन, मनन आणि साधना करून संमेलनातून “सनाथ” होऊन जावे, असे आवाहन परमहंस परिराजकाचार्य शंकर भारती यांनी केले.

त्र्यंबकेश्वर येथील अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ आणि निफाड येथील श्री स्वामी समर्थ केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय नाथ संमेलनाचे उद्घाटन कर्नाटकातील श्री संस्थान मठ संकेश्वर करवीर पीठाचे जगद्गुरु शंकराचार्य सच्चिदानंद अभिनव विद्या नृसिंहभारती यांच्या शुभहस्ते भक्तीपूर्ण वातावरणात संपन्न झाले. यावेळी शंकर भारती बोलत होते.

संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यास त्र्यंबकेश्वर गुरुपीठाचे चंद्रकांतदादा मोरे, रामप्रभुजी महाराज, राजेंद्रगिरी महाराज, संगमनाथ महाराज, गणेशगिरी महाराज, रामस्वरूप महाराज, सागर महाराज, गोरक्षनाथ शोधपीठाचे डॉ. कुशलनाथ मिश्रा, गणेशनाथ महाराज यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

संमेलनाच्या निमित्ताने सकाळी शंकराचार्य सच्चिदानंद अभिनव विद्या नृसिंहभारती यांची शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. रथातून निघालेल्या या मिरवणुकीत मंगलवाद्यांचा गजर, जयघोष आणि भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळाले. नवनाथांची वेशभूषा केलेली बालके, नवनाथांच्या मूर्ती, डोक्यावर कलश घेतलेल्या सुवासिनी तसेच सेवेकरी आणि नाथभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वागताध्यक्ष वि. दा. व्यवहारे यांनी प्रास्ताविकातून निफाड येथील श्री गुरुदेव नाथांच्या संजीवन समाधीचा इतिहास उलगडून सांगितला. नाथ संमेलन आयोजित करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना त्यांनी नाथ परंपरेचा आध्यात्मिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज व्यक्त केली.



यावेळी त्र्यंबकेश्वर गुरुपीठाचे चंद्रकांतदादा मोरे यांनी श्री नवनाथांचे कार्य, समाजप्रबोधनातील त्यांचे योगदान आणि स्वामी सेवा मार्ग याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. नाथ परंपरेतील साधना, सेवा आणि अध्यात्म यांचे महत्त्व त्यांनी उपस्थितांना पटवून दिले.

उद्घाटन सोहळ्यास संदीप सुराणा, मिलिंद चव्हंडके, राजेंद्र राठी, रतनताऱ्या वडघुले, किरण कापसे, विश्वास कराड, मधुकर राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.

दुपारच्या सत्रात विविध विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली. गोरक्षनाथ शोधपीठाचे डॉ. कुशलनाथ मिश्रा यांनी “नाथपंथ आणि मत्स्येंद्रनाथ” या विषयावर मार्गदर्शन करताना नाथ संप्रदायाची ऐतिहासिक परंपरा आणि त्याचे सामाजिक योगदान विशद केले. तसेच सज्जनगड येथील डॉ. भूषण स्वामी यांनी “नाथ संप्रदाय व समर्थ रामदास” या विषयावर व्याख्यान देत नाथ परंपरा आणि समर्थ विचार यातील साम्य अधोरेखित केले.

राष्ट्रीय नाथ संमेलनासाठी राज्यासह परराज्यातून नाथभक्त, सेवेकरी आणि विविध मठांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम भक्ती, अध्यात्म आणि नाथ परंपरेच्या जयघोषाने भारावून गेला होता.

# आ. अब्दुल सत्तार यांच्या मध्यस्थीने आमरण उपोषण मागे

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर :** मौजे वसई (ता. सिल्लोड) येथील गट क्रमांक १५२ मधील फेरदुरुस्ती करून सुधारित फेर मिळावा, या मागणीसाठी तहसील कार्यालयासमोर गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेले आमरण उपोषण आमदार अब्दुल सत्तार यांच्या यशस्वी मध्यस्थीनंतर मागे घेण्यात आले.




या प्रकरणात नियमानुसार कायदेशीर पडताळणी करून योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले आहे.

वसई येथील जानुबा काशिनाथ खिल्लारे, कारभारी काशिनाथ खिल्लारे आणि संतोष हरिकीसन खिल्लारे यांनी ५ मे पासून हे आमरण उपोषण सुरू केले होते.

संबंधित जमिनीच्या फेरदुरुस्ती संदर्भात तातडीने निर्णय घेण्याची त्यांची मागणी होती.

या आंदोलनाची दखल घेत आमदार अब्दुल सत्तार यांनी उपोषणस्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांशी सविस्तर चर्चा केली व त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या.

त्यानंतर आ. सत्तार यांनी तातडीने महसूल प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी या विषयावर मध्यस्थी केली.

यावेळी उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण, तहसीलदार अंकिता ताकभाते, नायब तहसीलदार तुकाराम बनकर यांच्यासह महसूल विभागाच्या अन्य अधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

सदर प्रकरण नियमानुसार तपासून त्यावर सकारात्मक आणि कायदेशीर भूमिका घेतली जाईल, असे प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. या ठोस आश्वासनानंतर उपोषणकर्त्यांचे समाधान झाले आणि त्यांनी आपले आंदोलन मागे घेतले.

याप्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव तायडे, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, जिल्हा परिषद सदस्य देविदास पालोदकर, राजेंद्र ठोंबरे, संजय डमाळे, शंकरराव खांडवे, नगरसेवक शेख इम्रान, सिद्धेश्वर आहेर यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती

## १२ वैचारिक सत्रे; १५० निमंत्रित पदाधिकाऱ्यांचा सहभाग

**दैनिक युवक आधार**
**राहुल मडावी नागपूर :** भारतीय जनता पार्टी, नागपूर महानगरच्या वतीने 'पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान - २०२६' अंतर्गत दोन दिवसीय निवासी महानगर प्रशिक्षण वर्गाची सुरुवात आज, ९ मे पासून वर्धा रोड येथील ॲम्ब्रोशिया फार्म येथे झाली. भारतीय जनता पक्ष महानगर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांच्या अध्यक्षतेखाली पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून व भारतमातेचे पूजन करून प्रशिक्षण वर्गाचे उदघाटन करण्यात आले. यावेळी मंचावर प्रदेश उपाध्यक्ष उपेंद्र जी कोठेकर,आमदार परिणय फुके,खासदार मायाताई ईवनाते, भाजप शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी,प्रदेश उपाध्यक्ष संजयजी भेंडे,माजी आमदार गिरीश जी व्यास,माजी आमदार अनिलजी सोले,माजी आमदार डॉ मिलिंद माने,प्रदेश उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम,उप महापौर लीना ताई हातीबेड,सत्तापक्ष नेता बाल्या बोरकर,श्रीकांत जी देशपांडे,अशोक जी मेंढे इत्यादी



मंचावर उपस्थित होते,यावेळी प्रशिक्षण वर्गाचे प्रास्ताविक परिणय फुके यांनी मांडले,चंद्रशेखर बावनकुळे यांनी केंद्र व राज्य सरकार योजनांची कामगिरी या विषयावर सत्र घेऊन उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.या प्रशिक्षण अभियानांतर्गत यापूर्वी विधान सभा निहाय व मंडळ स्तरावर निवासी प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे. आता महानगर स्तरावरील या दोन दिवसीय निवासी वर्गामध्ये एकूण १२ सत्रांचे नियोजन करण्यात आले आहे. या सत्रांमध्ये विविध अनुभवी वक्ते कार्यकर्त्यांना संघटन कौशल्य, सरकारी योजनांची माहिती, कार्यपद्धती,बूथ व्यवस्थापन, कार्यकर्ता विकास, देशासमोरील आव्हान,सोशल मीडिया वापर व एआय,वैचारिक अधिष्ठानावर व इतर विषयांवर मार्गदर्शन करतील. विशेष म्हणजे, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी हे स्वतः विविध विषयांवर सत्र घेऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत.या दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गासाठी संपूर्ण नागपूर महानगरातून सुमारे १५० प्रमुख पदाधिकाऱ्यांना निमंत्रित करण्यात आले आहे. दोन दिवसांच्या या कालावधीत विविध विषयांवर सखोल चिंतन करून भारतीय जनता पार्टीची विचारधारा आणि उद्दिष्टे सामान्य जनतेपर्यंत प्रभावीपणे कशी पोहोचवता येतील,याची रणनीती आखली जाणार आहे.प्रशिक्षण वर्गाचे संचलन प्रशिक्षण वर्ग प्रमुख संदीप जाधव यांनी केले.या प्रशिक्षण वर्गाबाबत माहिती देताना शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी म्हणाले की,"भाजप हा संघटन आधारित पक्ष आहे,संघटन हे कार्यकर्ता आधारित आहे तर हा कार्यकर्ता नीती आधारित आहे.कार्यकर्त्या मुळे संघटन तर संघटन मुळे पक्ष मजबूत होतो" भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याला पक्षाची विचारधारा, पंडित दीनदयाल उपाध्याय यांचे तत्वज्ञान आणि केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्याचे कौशल्य प्राप्त व्हावे,हा या वर्गाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

# पालखेड वि .का .संस्थेच्या चेअरमनपदी रंजनामाई थेटे तर उपसभापतीपदी बाबासाहेब शिंदे यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** पालखेड विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या चेअरमनपदी निफाड पंचायत समितीच्या माजी सदस्या तथा पिंपळगाव ब बाजार समितीच्या माजी संचालिका रंजनामाई भाऊसाहेब थेटे यांची तर उपसभापतीपदी रासाकाचे माजी व्हा.चेअरमन तथा पिंपळगाव ब बाजार समितीचे माजी संचालक बाबासाहेब शंकरराव शिंदे बिनविरोध निवड करण्यात आली.

आवर्तनानुसार मावळते चेअरमन ज्ञानेश्वर जाधव व उपसभापती असलेले अंबादास कोकाटे यांनी आपल्या पदांचे राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागांवर निवडणूक निर्णय अधिकारी दत्तात्रय नाईकरे तर सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी माधव पगारे यांनी संचालक मंडळाची निफाडच्या सहाय्यक निबंधक कार्यालयात निवडसभा बोलाविण्यात आली होती.याप्रसंगी चेअरमनपदासाठी



रंजनामाई थेटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला त्यावर सुचक म्हणुन ज्ञानेश्वर जयराम जाधव यांनी तर उपसभापतीपदी बाबासाहेब शंकरराव शिंदे यांना सुचक बाळासाहेब बंडु थेटे यांनी स्वाक्षरी केली. दिलेल्या विहित मुदतीत चेअरमन,व्हा.चेअरमन पदांकरीता एकच उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने संस्थेच्या चेअरमनपदी सौ.रंजनामाई भाऊसाहेब थेटे तर व्हा.चेअरमनपदी बाबासाहेब शिंदे यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणुक निर्णय अधिकारी नाईकरे यांनी जाहीर केले.यावेळी कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करीत आनंदोत्सव साजरा केला.

याप्रसंगी संचालक बाळासाहेब थेटे,ज्ञानेश्वर जाधव ,रावसाहेब शिंदे,विलास थेटे, बाबाजी आहेर , ज्ञानेश्वर आहेर,दशरथ जगझाप,अंबादास कोकाटे ,सौ आश्विनी आहेर,पंडित आहेर, हेमंत थेटे यांसह पोपटराव चौधरी,सुकदेव थेटे,श्रीधर जाधव,अनिल मेधने आदिंसह रमेश शिंदे,संकेत डोखळे,भाऊसाहेब थेटे,भाऊसाहेब शिंदे,बाळुनाना आहेर, संजय शिंदे, शरद जाधव, श्रीधर जाधव,केशव शिंदे,संजय थेटे, गणेश महाले, सतिष थेटे,पवन जाधव,भगवान थेटे,प्रमोद मतसागर आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.नवनिर्वाचितांचे आमदार दिलीप बनकर माजी आमदार अनिल कदम,तालुकाध्यक्ष राजेंद्र डोखळे आदिंनी अभिनंदन केले आहे.

**ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली आजपर्यंत विविध संस्थांमध्ये कामकाज केले असून संस्था व गावहितासाठी सर्वांना सोबत घेऊन समाजकारण-राजकारण केल्याची पावती म्हणुन आज सर्व संचालक,जेष्ठ नागरीक,सभासद व नागरीकांनी माझ्यावर जो विश्वास दाखवत चेअरमनपदाची संधी दिली त्याबद्दल सर्वांचे आभार मानते. यापुढेही सर्वांना सोबत घेऊन संस्था व सभासद हितासाठी कामकाज करेन.**

**सौ.रंजनामाई थेटे :-नवनिर्वाचित चेअरमन,पालखेड सोसायटी**

# सिल्लोडमध्ये 'त्या' बहुमजली हॉस्पिटलच्या बांधकामावरून संतापाची लाट!

## नगररचना नियमांच्या कथित उल्लंघनाविरुद्ध राजू रोजेकर आजपासून उपोषणावर

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख :** सिल्लोड शहरातील सर्वे नं. १५, शिवाजी नगर परिसरात उभारण्यात येत असलेल्या एका बहुमजली हॉस्पिटलच्या कथित बेकायदेशीर बांधकामामुळे संपूर्ण शहरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित बांधकाम कोणतीही वैध परवानगी नसताना नगररचना नियम, एफएसआय (FSI) मर्यादा, सेटबॅक आणि बांधकाम सुरक्षा निकषांचे उल्लंघन करून सुरू असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते राजू भागवत रोजेकर यांनी केला आहे. या प्रकरणाच्या निषेधार्थ रोजेकर आज (ता. ११) पासून तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसणार आहेत.

राजू रोजेकर यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाचे उल्लंघन करून करण्यात आले आहे. यात बेकायदेशीर अंडरग्राउंड (Basement) बांधकामासह सेटबॅक व अग्निसुरक्षा



नियमांची पायमल्ली करण्यात आली आहे. वारंवार लेखी तक्रारी, स्मरणपत्रे व अंतिम निवेदने सादर करूनही प्रशासनाने कोणतीही प्रभावी पाडकाम अथवा दंडात्मक कारवाई केलेली नाही. संबंधित बांधकाम दिवसेंदिवस पूर्णत्वाकडे जात असताना प्रशासन केवळ कागदी आश्वासने देत असल्याने अधिकारी व कर्मचारी यांच्या भूमिकेवरही संशय व्यक्त केला जात आहे.

**सामान्यांचे साहित्य जप्त, मग प्रभावशाली बांधकामावर मौन का?**

शहरातील एखाद्या सर्वसामान्य नागरिकाने किरकोळ बांधकाम सुरू केले तरी नगर परिषद प्रशासन तात्काळ पथक पाठवून साहित्य जप्त करते आणि दंड आकारते. मात्र शहराच्या मध्यवर्ती भागात उभे राहत असलेल्या या बहुमजली कथित अवैध हॉस्पिटलवर प्रशासनाने अद्याप कोणतीही कठोर कारवाई केलेली नाही. "गरीबांसाठी वेगळा कायदा आणि प्रभावशाली लोकांसाठी वेगळा कायदा आहे का?" असा संतप्त सवाल राजू रोजेकर यांनी उपस्थित केला असून प्रशासनाच्या पारदर्शकतेवर शंका निर्माण झाली आहे.

या प्रकरणात तातडीने कायदेशीर कारवाई न झाल्यास राजू भागवत रोजेकर आज सकाळी ११ वाजेपासून तहसील कार्यालयासमोर उपोषणास बसत आहेत. उपोषणादरम्यान उद्भवणाऱ्या सर्व कायदेशीर, सामाजिक व प्रशासकीय परिणामांची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासनावर राहील, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला आहे. आता खरोखर कारवाई होणार की पुन्हा एकदा फक्त कागदी घोडे नाचणार? याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

# पिलीव शूरवीर शिवाजी काशीद जयंती उत्साहात साजरी"

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर)** :-माळशिरस तालुक्यातील समस्त नाभिक समाजाच्या वतीने सालाबाद प्रमाणे "श्री संतसेना महाराज" मंदिरामध्ये अध्यक्ष मंगेश वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व नाभिक बांधवांच्या उपस्थितीमध्ये" शूरवीर शिवाजी काशिद"यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्व उपस्थितांचे हस्ते "शूरवीर शिवाजी काशीद व जिवा महाले"यांचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. "श्री संत सेना महाराज व श्री नागोबा राया"यांचे दर्शनाचा लाभ झाला. नुकतेच "श्री संत सेना महाराज व श्री नागोबा राया"यांचे मंदिराचे सभा मंडपाचे रेखीव व देखणे बांधकाम पाहून उपस्थित त्यांना धन्य, धन्य वाटले. निसर्गरम्य वातावरणात "श्री संत सेना महाराज , नागोबा राया" यांचे मंदिर अतिशय दिमाखात दिसत असल्याची चर्चा होत आहे. यावेळी वाघमारे ,देवकर ,काळे, शिंदे ,गवळी, जाधव, काशीद, राऊत परिवारातील व सर्व नाभिक बांधव उपस्थित होते."

# विनयभंग प्रकरणातील आरोपीला नियमित जामीन; बिलोली अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाचा निर्णय

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी:महादेव उप्पे :** देगलूर(दि.१०) मरखेल पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा क्रमांक 58/2026 मधील आरोपी बालाजी मारोती तोटावार यास बिलोली येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला आहे. मा.न्यायालयाने नुकताच हा आदेश पारित केला.

सदर प्रकरणात फिर्यादी महिलेच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहितेच्या कलम 75(2) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला होता.आरोपीस अटक झाल्यानंतर त्याच्या वतीने नियमित जामीनासाठी अर्ज दाखल करण्यात आला. सुनावणीदरम्यान बचाव पक्षाने न्यायालयासमोर सविस्तर बाजू मांडली.

सुनावणीदरम्यान बचाव पक्षाकडून ॲड.अंकुशराजे जाधव व ॲड.सद्दाम शेख दावणगीरकर यांनी आरोपीविरुद्ध करण्यात आलेले आरोप अतिशयोक्त व तथ्यहीन असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.तसेच तपास पूर्णत्वाच्या टप्प्यात असून आरोपीचा कोणताही गुन्हेगारी पूर्वइतिहास नसल्याची बाबही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आली.दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून न्यायालयाने आरोपीस नियमित जामीन मंजूर केला.

न्यायालयाने आरोपीस पन्नास हजार रुपयांचा जामीन मंजूर केला असून,तपास यंत्रणेस आवश्यकतेनुसार सहकार्य करणे तसेच न्यायालयीन सुनावणीस नियमित उपस्थित राहण्याच्या अटी घालण्यात आल्या आहेत.सदर जामीन अर्जाच्या कामकाजात ॲड. अंकुशराजे जाधव व ॲड.सद्दाम शेख दावणगीरकर यांनी बाजू मांडली.

# राघवेंद्र अंगद सुरोशे यांचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

**दैनिक युवक आधार**
**हिमायतनगर ता.प्रतिनिधी /माधव काईतवाड बोरगडीकर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावी परीक्षा फेब्रुवारी २०२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून, कारला येथील विद्यार्थी राघवेंद्र अंगद सुरोशे यांनी ९०.४० टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.



राघवेंद्र यांनी आपल्या सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर हे यश मिळविले. ते शहरातील राजा भगीरथ विद्यालयाचे विद्यार्थी असून, विद्यालयातील शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन यामुळेच हे यश मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.यशामागे आई-वडील, शिक्षक व कुटुंबीयांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे सांगताना राघवेंद्र यांनी भविष्यात उच्च शिक्षण घेऊन मोठे अधिकारी बनण्याची इच्छा व्यक्त केली.त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, मित्रपरिवार तसेच नातेवाईकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेच्या रौप्य महोत्सवानिमित्त १७ आणि १८ मे रोजी 'जलसंवाद' आणि 'जलक्रांती परिषद'

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनात भव्य सोहळा**
**अभिनेते आमिर खान, नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे यांची विशेष उपस्थिती**
**देशभरातील पद्म पुरस्कार विजेते जलतज्ज्ञ आणि संशोधकांची उपस्थिती**
**शेतकरी आत्महत्यामुक्त विदर्भासाठी जलसंधारणाच्या उपायांवर होणार मंथन**
**विदर्भातील शेतकरी, सरपंच, लोकप्रतिनिधींचा मोठ्या संख्येने सहभाग**

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** 'पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्था' गेल्या २५ वर्षांपासून जलसंधारणाच्या क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहे. संस्थेने उभारलेल्या 'तामसवाडा मॉडेल'ची दखल आज देशभर घेतली जात आहे. संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून नागपुरात दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १७ मे २०२६ रोजी 'नागपूर जलसंवाद-२०२६' आणि दि. १८ मे २०२६ रोजी 'जलक्रांती परिषद' अशा दोन टप्प्यात हा रौप्य महोत्सव साजरा होणार आहे. यामध्ये देशभरातील दिग्गज जलतज्ज्ञ, पद्म पुरस्कार विजेते आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर सहभागी होणार आहेत. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनात या रौप्य महोत्सवी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.*

यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत केंद्रीय मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांनी पत्रकारांशी संवाद साधला. सोबतच आमदार चरणसिंग ठाकूर, आमदार उमेश यावलकर, पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष दत्ताजी जामदार, सचिव माधव कोटस्थाने, अनिल सांबरे, सुमंत पुणतांबेकर, मनोहरराव कुंभारे, सचिन कुळकर्णी, सुधीर दिवे, नितीन कुळकर्णी यांची उपस्थिती होती.

दि. १७ मे २०२६ : 'नागपूर जलसंवाद'

(विषय - शेतकरी आत्महत्यामुक्त विदर्भासाठी जलसंधारण एक उपाय)

रौप्य महोत्सवी सोहळ्याच्या पहिल्या दिवशी, रविवार दि. १७ मे २०२६ रोजी दुपारी ४:०० वाजता सिव्हिल लाईन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात 'नागपूर जलसंवाद २०२६' या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. 'शेतकरी आत्महत्यामुक्त विदर्भासाठी जलसंधारण एक उपाय' या मुख्य विषयावर यावेळी सखोल मंथन केले जाणार आहे. विदर्भातील पाणीटंचाई आणि सिंचनाच्या समस्यांवर मात करून शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य देण्याच्या उद्देशाने हा राष्ट्रीय स्तरावरील संवाद आयोजित करण्यात आला आहे.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. श्री. नितीनजी गडकरी असतील. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून पद्मभूषण डॉ. अनिल प्रकाश जोशी (डेहराडून), पद्मश्री उमाशंकरजी पांडे (चित्रकूट), पद्मश्री सेठपाल सिंग (सहारनपूर) हे दिग्गज उपस्थित राहून आपले मार्गदर्शन करतील. तसेच, केशोब कृष्ण छत्रधारा (आसाम), संजय कश्यप (सेंटर फॉर वॉटर पीस), जलतज्ज्ञ श्रीमती स्वेडेविनो नात्सो (नागालँड) आणि राज्याचे राज्यमंत्री ना. ॲड. आशिष जयस्वाल व ना. डॉ. पंकज भोयर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

**दि. १८ मे २०२६ : 'जलक्रांती परिषद'**

सोहळ्याच्या दुसऱ्या दिवशी, सोमवार दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात 'जलक्रांती परिषदे'चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात संस्थेच्या २५ वर्षांच्या प्रवासाचा आढावा घेतला जाणार असून, विदर्भातील 'तामसवाडा पॅटर्न' सारख्या यशस्वी जलसंधारण प्रयोगांवर चर्चा होईल.

या परिषदेला विशेष आकर्षण म्हणून प्रसिद्ध अभिनेते आणि 'पाणी फाउंडेशन'चे संस्थापक आमीर खान, 'नाम फाउंडेशन'चे अध्यक्ष श्री. नाना पाटेकर, आणि सचिव श्री. मकरंद अनासपुरे यांची प्रमुख उपस्थित राहणार आहेत. याशिवाय राज्याचे मृदा व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख आणि गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांची देखील विशेष उपस्थिती लाभणार आहे. जलक्रांती परिषदेसाठी विदर्भातील शेतकरी व सरपंच मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

दि. १८ मे रोजी मुख्य कार्यक्रम आटोपल्यावर दुपारी २.३० वाजता जलसंवर्धन आणि भूजल पुनर्भरण या विषयांवर सखोल चिंतन होईल. तसेच 'पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थे'ने गेल्या अडीच दशकांत केलेल्या कार्यावर चर्चा होईल. या समृद्ध जल-अभियानात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रफुल्लदत्त जामदार आणि सचिव श्री. माधव कोटस्थाने यांनी केले आहे.या रौप्य महोत्सवी सोहळ्याच्या निमित्ताने 'जलपर्व', 'जलक्रांती', 'कृषिकल्याण' आणि 'कॉरिडॉर्स ऑफ वॉटर सिक्योरिटी' या महत्त्वपूर्ण पुस्तकांचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते केले जाईल.

---

**निफाडच्या दर्शन सूर्यवंशीची यूपीएससीत दमदार झेप**

## भारतीय वन सेवा परीक्षेत देशात १०२ वा क्रमांक; विभागीय वन अधिकारीपदी निवड

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** निफाड येथील दर्शन राजेंद्र सूर्यवंशी याने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) माध्यमातून घेण्यात आलेल्या भारतीय वन सेवा (Indian Forest Service – IFS) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. देशभरातून झालेल्या या स्पर्धात्मक परीक्षेत दर्शनने १०२ वा क्रमांक मिळवत विभागीय वन अधिकारी (Divisional Forest Officer) पदासाठी निवड मिळवली आहे. त्याच्या या यशामुळे निफाड तालुक्यासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दर्शन सूर्यवंशी हा अभियांत्रिकी पदवीधारक असून त्याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण निफाड येथील वैनतेय विद्यालयात झाले. शालेय जीवनापासूनच तो अत्यंत हुशार विद्यार्थी म्हणून ओळखला जात होता. इयत्ता चौथी व सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत त्याने यश मिळवले होते. तसेच दहावीच्या परीक्षेत तब्बल ९८.५५ टक्के गुण मिळवत त्याने शैक्षणिक गुणवत्ता



सिद्ध केली होती.

शैक्षणिक क्षेत्राबरोबरच क्रीडा क्षेत्रातही दर्शनने विशेष प्राविण्य मिळवले आहे. खो-खोच्या राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघातून प्रतिनिधित्व करत त्याने उत्कृष्ट कामगिरी केली होती.दहावीनंतर दर्शनने मुंबई येथील नामांकित व्ही.जे.टी.आय. महाविद्यालयातून मेकॅनिकल डिप्लोमा पूर्ण केला. त्यानंतर पुणे येथील सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स महाविद्यालयातून बी.ई. मेकॅनिकल पदवी संपादन केली.

स्पर्धा परीक्षांच्या तयारीदरम्यान दर्शनने इंटेलिजन्स ब्युरोची परीक्षा देखील उत्तीर्ण केली होती. मात्र अपेक्षित पद नसल्याने त्याने ती नोकरी नम्रपणे नाकारली. याशिवाय नामांकित आयटी कंपनी ॲक्सेंचरकडूनही त्याला नोकरीची ऑफर मिळाली होती. मात्र प्रशासकीय सेवेत जाण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवत त्याने सातत्याने अभ्यास सुरू ठेवला आणि अखेर भारतीय वन सेवेत यश मिळवले.

दर्शनचे वडील राजेंद्र सूर्यवंशी हे वैनतेय ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सचे निवृत्त प्राध्यापक आहेत, तर आई शोभा सूर्यवंशी या जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या निवृत्त शिक्षिका आहेत. कुटुंबातील शैक्षणिक वातावरण, मेहनत आणि चिकाटीच्या बळावर दर्शनने हे यश मिळवल्याची भावना व्यक्त होत आहे.दर्शन सूर्यवंशीच्या या यशाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, मित्रपरिवार तसेच निफाडकरांकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

---

## लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल, दहावी बोर्ड परीक्षाचा शंभर टक्के निकाल

### सलग चौदा वर्षापासून शंभर टक्के निकालाची परंपरा कायम

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** पाटोदा शहरातील नामांकित इंग्लिश स्कूल, लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल चा दहावी बोर्ड परीक्षेत नेहमी प्रमाणे सलग चौदाव्या वर्षीही शंभर टक्के निकाल लागला असून सर्व स्तरातून यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि शाळेचे कौतुक होत आहे. या वर्षी देखील शालेय विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले आहे. या मध्ये अनुक्रमे कुमारी वेदिका आणवणे हिने ९७.६०% मार्क्स मिळवून तालुक्यातून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे तर श्रेयस खंडागळे याने ९३.४०% घेऊन शाळेतून द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तसेच सामिया सय्यद हिने ९१.६० टक्के, तर अनुष्का अडागळे




हिने ९० टक्के आणि कुमारी घोलप तेजश्री हिने ८९ टक्के मार्क्स आणि बन कार्तिकी, इंगळे साक्षी यांनी मिळवले आहेत. तसेच ८० ते ९० टक्के मिळवणारे विद्यार्थी, सुजल खरमाटे, दिग्विजय जगदाळे, दानिश पठाण आयान शेख, प्रेमराज जाधव, प्रथमेश जाधव, करण घुमरे, जाधव सुयोग, सार्थक गीते, सानप कृष्णा यांनी इंग्रजी माध्यमातून तालुक्यातून मेरिट मध्ये येण्याचा मान मिळवला आहे. या यशाबद्दल शाळेचे संस्था प्रमुख श्री.पठाण सर, शालेय प्राथमिक विभागाच्या प्राचार्या सीमा माळी मॅडम, वर्ग शिक्षक शाहीद सर, सानप कृष्णा सर, सानप अर्जुन तसेच गणित तज्ञ श्री कांतीलाल घोलप सर, परीक्षा विभाग प्रमुख सावंत सर, उज्वला भोसले मॅडम, यांनी मुलांचे कौतुक आणि अभिनंदन केले आहे. शाळेने आता पर्यंत दहावी बोर्डाच्या चौदा बॅच यशस्वी रित्या पास आऊट केल्या असून, विद्यार्थ्यांनी दरवर्षी गुणवत्ता यादीत येऊन शाळेचा, पालकांचा आणि तालुक्याचा मान उंचावला आहे. या यशा साठी विद्यार्थ्यांचे सर्व पालक आणि शाळेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वच शिक्षक यांनी शाळेत येऊन सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

---

## खारघरात ५७ तोळे सोन्याच्या लुटीचा कट! मित्रानेच रचला डाव, पोलिसांचा अवघ्या काही दिवसांत पर्दाफाश

### विश्वासघाताची थरारक कथा! खारघरात मित्रानेच रचला सोन्याचा कट,जवळच्या मित्राचा विश्वासघात

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** नवी मुंबईच्या खारघर परिसरात घडलेल्या भयानक लूटप्रकरणाचा खारघर पोलिसांनी अवघ्या काही दिवसांतच पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात धक्कादायक बाब समोर आली असून, पीडित सुशांत नामदेव मोरे यांचा जवळचा मित्र अभिनंदन तानाजी माळी हाच या गुन्ह्याचा मुख्य सूत्रधार असल्याचे तपासात उघड झाले आहे. पोलिसांनी या प्रकरणी सात आरोपींना अटक करून लुटलेले ५७ तोळे सोन्याचे दागिने, शस्त्रे तसेच गुन्ह्यात वापरलेली वाहने जप्त केली आहेत. हे प्रकरण नवी मुंबईतील रहिवाशांसाठी इशारा देणारे ठरले आहे.

***घटनेचे डोळ्यात नोंदवणारे तपशील***

खारघर येथील रहिवासी सुशांत नामदेव मोरे (वय ३७) हे २२ एप्रिल रोजी मित्रांसोबत बेलापूर येथील एका हॉटेलमध्ये जेवण करून रात्री उशिरा घरी परतत होते. कार पार्क करून घराकडे चालत जात असताना अचानक तीन अज्ञात आरोपींनी त्यांच्यावर हल्ला चढवला. झटापटीदरम्यान मोरे यांच्या हातावर चाकूने वार करण्यात आला, ज्यामुळे त्यांना गंभीर जखम झाली.



आरोपींनी चालक महेश हाटे यांच्या ताब्यात असलेली ५७ तोळे सोन्याच्या दागिन्यांची बॅग हिसकावून घेतली आणि घटनास्थळावरून पळून गेले. मोरे यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांची प्रकृती आता बरी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

***वेगवान तपास आणि आरोपींचा शोध***

घटनेनंतर खारघर पोलिसांनी तात्काळ तपासाची सूत्रे हाती घेतली. खारघर, तळोजा, कामोठे आणि कळंबोली पोलिसांच्या विशेष पथकांनी संयुक्तपणे आरोपींचा माग काढला. सीसीटीव्ही फुटेजचे तांत्रिक विश्लेषण, गुप्त माहिती आणि स्थानिक सूत्रांवर अवलंबून तपासाची चक्रे वेगाने फिरवण्यात आली. तपासादरम्यान धक्कादायक खुलासा झाला – फिर्यादी मोरे यांचा जवळचा मित्र अभिनंदन तानाजी माळी यानेच पत्नी कोमल माळी, वैभव माळी आणि इतर साथीदारांच्या मदतीने हा संपूर्ण कट रचला होता. सोन्याच्या हालचालींबाबतची माहिती आरोपींकडे आधीपासून असल्याने ही लूट नियोजनपूर्वक करण्यात आली होती.

गुन्ह्यानंतर आरोपींनी पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी तेलंगणा, सांगली, सातारा, सोलापूर आणि पंढरपूरसारख्या विविध ठिकाणी सतत वास्तव्य बदलले. मात्र, खारघर पोलिसांनी सापळा रचून त्यांचा माग काढला. अखेर शुभम पाटोळे, संदीप गुजंळे, हर्षद सागरे, राहुल उर्फ अमित माळी यांच्यासह अभिनंदन माळी आणि इतर दोन जणांना अटक करण्यात यश मिळाले. आरोपींकडून ५७ तोळे सोन्याचे दागिने, मारुती स्विफ्ट कार, दुचाकी वाहने तसेच गुन्ह्यात वापरलेली शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.

***मित्रांबद्दल आणि जनतेसाठी महत्त्वाचा संदेश***

हे प्रकरण एक धक्कादायक सत्य उघड करते – जवळचा मित्र हा विश्वासघात करू शकतो! नवी मुंबईसारख्या वेगाने वाढणाऱ्या शहरात रात्रीच्या वेळी एकटे फिरणे धोकादायक ठरू शकते. पोलिस आयुक्तांनी आवाहन केले आहे की, मौल्यवान वस्तूंसह प्रवास करताना सतर्क राहा, सीसीटीव्ही कव्हरेज असलेल्या रस्त्यांचा वापर करा आणि संशयास्पद हालचालींसाठी तात्काळ १०० किंवा ११२ वर कॉल करा. मित्रांनाही विश्वासापूर्वी सावधगिरी बाळगा – एक चुकीचा विश्वास लाखोंचा तोटा करू शकतो!

या प्रकरणाचा पुढील तपास खारघर पोलिस करत आहेत. नवी मुंबई पोलिस दलाने हे यश मिळवून नागरिकांचा विश्वास अधिक दृढ केला आहे.


---

## पालोदमध्ये घरफोडी; लाखोंचा ऐवज लंपास

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख :** सिल्लोड तालुक्यातील पालोद येथील रहिवासी संतोष नारायण पालोदकर यांच्या निवासस्थानी अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्री धाडसी घरफोडी करून लाखोंचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना रविवारी (ता. १०) उघडकीस आली. या चोरीमुळे गावात मोठी खळबळ उडाली असून, घटनेपूर्वी संबंधित परिसरात संशयास्पदरीत्या वावरताना चारही चोरटे शेजारच्या एका गल्लीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहेत.

प्राप्त प्राथमिक माहितीनुसार, चोरट्यांनी मध्यरात्री पालोदकर यांच्या घरात प्रवेश करून कपाटातील रोख रक्कम आणि मौल्यवान ऐवजावर डल्ला मारला. सकाळी घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसून आल्याने चोरीचा हा प्रकार समोर आला. घटनेची माहिती




**संतोष पालोदकर यांच्या घरात चोरी; सशस्त्र चौघे सीसीटीव्हीमध्ये कैद**

मिळताच सिल्लोड ग्रामीण पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली व रितसर पंचनामा केला.घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने पाहणी केल्यानंतर श्वान पथकाला पाचारण केले होते. श्वान पथकाने घटनास्थळापासून काही अंतरापर्यंत चोरट्यांचा माग काढण्याचा प्रयत्न केला. तसेच पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तांत्रिक तपासणी केली असता, पालोदकर यांच्या निवासस्थानाकडे जाणाऱ्या गल्लीच्या परिसरातून वावरताना दुसऱ्या एका गल्लीतील खासगी कॅमेऱ्यात पहाटे ०२:१५ वाजताच्या सुमारास चार अज्ञात चोरटे स्पष्ट दिसत आहेत. यातील चोरट्यांच्या हातात बॅटरी (टॉर्च) आणि दरवाजा तोडण्यासाठी लागणारी कटावणी व इतर हत्यारे दिसून येत आहेत.याप्रकरणी पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून, सीसीटीव्ही फुटेजमधील तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पुढील कायदेशीर कार्यवाही सिल्लोड ग्रामीण पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# उलवेत १३ मे रोजी लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवी अभिष्टचिंतन सोहळा; शाळा इमारतीचे उद्‌घाटन

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवरांची लाभणार उपस्थिती**

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** गोरगरिबांचे आधारस्तंभ, सर्व समाजाचे प्रेरणास्थान थोर दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सत्कार सोहळा तसेच दर्जेदार शिक्षण देणाऱ्या आणि नावलौकिक असलेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलच्या इमारतीचा उदघाटन सोहळा महाराष्ट्राचे राज्याचे कार्यकुशल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार दिनांक १३ मे रोजी सायंकाळी ०६.३० वाजता उलवे नोड मधील रामशेठ ठाकूर मैदानावर भव्य स्वरूपात होणार असल्याची माहिती जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज (रविवार, दि. १०) येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यलयात झालेल्या या पत्रकार परिषदेस लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समितीचे कार्याध्यक्ष व भाजपचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्यासह पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढे माहिती देताना सांगितले कि, या सोहळयास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे वने मंत्री गणेश नाईक, महिला व बाल कल्याण मंत्री आदितीताई तटकरे, रोजगार हमी फलोत्पादन व खार जमीन विकास मंत्री भरतशेठ गोगावले, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष व रायगड लोकसभा खासदार सुनिल तटकरे, मावळ लोकसभा खासदार श्रीरंग बारणे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार रवीशेठ पाटील, आमदार डॉ. विश्वजित कदम, आमदार मंदाताई म्हात्रे, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे, आमदार निरंजन डावखरे, आमदार विक्रांत पाटील, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, माजी खासदार धैर्यशिल पाटील, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढे सांगितले कि, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षाची सुरुवात मागील वर्षी भव्य कीर्तन महोत्सवाने झाली. भजन महोत्सव, ७५ अभंग लोकार्पण, कबड्डी स्पर्धा, रक्तदान शिबिरे, नाट्य महोत्सव, रोजगार मेळावा, यूपीएससी एमपीएससी प्रशिक्षण, सामूहिक बासुरी वादन, नाट्य शिबीर, आगरी कोळी महोत्सव, शिधा वाटप अशी अनेक समाजोपयोगी उपक्रमे पुढे वर्षभर सुरु राहिली असल्याचेही त्यांनी नमूद केले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक कार्यातून हजारो युवकांना रोजगार, शिक्षण व सामाजिक आधार देण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक शैक्षणिक आणि सामाजिक संस्था उभ्या राहिल्या असून समाजातील सर्व घटकांसाठी त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर हे समाजकारणाला प्राधान्य देणारे आणि दानशूर वृत्तीचे नेतृत्व म्हणून ओळखले जातात. गरीब कुटुंबातून पुढे येत त्यांनी संघर्षाच्या जोरावर आपले स्थान निर्माण केले. त्यांच्या कार्याचा मुख्य गाभा समाजसेवा आहे. शिक्षण, सामाजिक, आरोग्य, क्रीडा, सांस्कृतिक, आपत्ती मदत या क्षेत्रांमध्ये त्यांनी मोठे योगदान दिले आहे. अनेक शिक्षण संस्थांना मदत करून ग्रामीण आणि कष्टकरी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे त्यांनी खुली केली.सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून ते सतत गरजू लोकांना मदत करतात. समाजातील वंचित, पीडित आणि गरजू लोकांना आधार देणे हे त्यांचे जीवनव्रत आहे. राजकारणात असूनही त्यांनी नेहमी समाजकारणाला अग्रक्रम दिला. त्यांच्या साधेपणा, जनसंपर्क आणि लोकाभिमुख कार्यामुळे ते महाराष्ट्रातील एक आदर्श लोकनेते म्हणून ओळखले जातात. त्यामुळे त्यांचा अमृतमहोत्सवी वर्ष महत्वाचा आणि प्रेरणादायी आहे. त्याच अनुषंगाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनावर आधारीत आढावा घेणाऱ्या 'रामपर्व' या विशेष पुस्तकाची निर्मिती करण्यात आली असून त्याचे प्रकाशनही यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

उलवे परिसरातील विद्यार्थ्यांना आधुनिक आणि दर्जेदार शिक्षण उपलब्ध व्हावे या उद्देशाने उभारण्यात आलेली रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल ही प्रशस्त इमारत, सुसज्ज वर्गखोल्या अत्याधुनिक सुविधा आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षण पद्धतीमुळे परिसरासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या विद्यालयाचा उद्घाटन सोहळा यावेळी संपन्न होणार आहे. तरी या विशेष सोहळयास पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक आमदार प्रशांत ठाकूर, लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समितीचे अध्यक्ष आमदार महेश बालदी, समितीचे कार्याध्यक्ष व ज्येष्ठ नेते जे. एम.म्हात्रे यांनी या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केले आहे.

# कार पलटी झाल्याने एकाचा मृत्यू, 5 जण जखमी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल तालुक्यातील चिंचवली-दूंद्रेजवळील चिंचवली बस स्टॅन्डजवळ रस्त्याच्या कडेला जाऊन कार पलटी झाल्याने झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला तर पाचजण जखमी झाले. राजवीर विक्रम सिंग (४०, राहणार ग्रीन एकर सोसायटी वाकडी) असे मृत इसमाचे नाव आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. नऊ मे रोजी रात्री दहाच्या सुमारास यातील मयत राजवीर विक्रम सिंग हे त्यांची एर्टिगा कार क्रमांक एम एच 0 3 इजी 5481 मध्ये एकूण सहा जण दूंद्रेकडून पनवेलच्या दिशेने जात होते. रात्री दहाच्या सुमारास चिंचवली बस स्टॅन्ड जवळ त्यांचे कार वरील नियंत्रण सुटले आणि कार रस्त्याच्या खाली जाऊन पलटी झाली. या झालेल्या अपघातात दोघेजण कारच्या बाहेर फेकले गेले. या अपघातात राजवीर विक्रम सिंग हे गंभीर जखमी झाले. आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला तर अलोक रमेश लोखंडे, मजहर खान, कादर ,रोहन नागपूरकर आणि शाहिद हे पाच जण जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच पनवेल तालुका पोलीस स्टेशनचे अधिकारी, पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृत इसम तसेच अपघातातील जखमी इसमांना रुग्णालयात दाखल केले. या अपघाताची माहिती मिळाल्यानंतर घटनास्थळी मोठ्या प्रमाणावर नागरिक जमा झाले होते. वाहन चालवताना वाहतुकीच्या नियमांचे पालन करून वाहन चालवावे असे आवाहन प्रशासन कडून करण्यात येत आहे.




**अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद आणि पनवेल महानगर प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सत्कार संस्थेचे विश्वस्त तथा रायगड प्रेस क्लबचे संस्थापक एस. एम. देशमुख तसेच अध्यक्ष मिलिंद अष्टिवकर यांच्या पुढाकाराने करण्यात आला. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महानगर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे, ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, विजय पवार, रत्नाकर पाटील, हरेश साठे, नितीन कोळी यांच्यासह पत्रकार उपस्थित होते.**
**( दैनिक युवक आधार )**

# सातपाटी बंदराचा विकास पालघर जिल्ह्याच्या आर्थिक परिवर्तनाचा पाया ठरणार: पालकमंत्री गणेश नाईक

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** सातपाटी बंदराचा विकास हा केवळ पायाभूत सुविधांचा प्रकल्प नसून, तो पालघर जिल्ह्याच्या आर्थिक परिवर्तनाचा पाया ठरणार असल्याचा विश्वास राज्याचे वन मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केला. पालघर जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण मासेमारी केंद्र असलेल्या सातपाटी येथे सुमारे 350 कोटी रुपयांच्या अत्याधुनिक मत्स्यबंदर विकास प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा राज्याचे मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणेयांच्या हस्ते उत्साहात पार पडला त्यावेळी ते बोलत होते.

या सोहळयास खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार राजेंद्र गावित, मनिषा चौधरी, राजन नाईक, विलास तरे, जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड, मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, पोलीस अधीक्षक यतीश देशमुख उपवनसंरक्षक दिवाकर निरंजन , जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रकाश निकम, सातपाटी सरपंच सीमा भोईर यांच्यासह विविध मान्यवर, मच्छीमार संस्था पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

पालकमंत्री गणेश नाईक पुढे म्हणाले की, या प्रकल्पामुळे सातपाटीचा चेहरामोहराच बदलणार असून भविष्यात हे गाव नगरपालिका होण्याइतपत विकसित होईल." त्याच बरोबरत्यांनी




वाढवण बंदराबाबत स्थानिकांना विश्वास देत, भूमिपुत्रांच्या हिताला प्राधान्य देण्याची सरकारची भूमिका स्पष्ट केली. मच्छीमारांच्या प्रश्नांवर बोलताना पालकमंत्री गणेश नाईक म्हणाले की, "समुद्रात 10-15 दिवस जीव धोक्यात घालून मासेमारी करणाऱ्या पारंपरिक मच्छीमारांच्या वेदना सरकारला समजतात. कधी कधी डिझेल खर्चही निघत नाही, अशा परिस्थितीत त्यांना सक्षम करणे ही सरकारची जबाबदारी असल्याचे ही त्यांनी यावेळी सांगितले पावसाळयात खराब झालेल्या सुकी मासळीच्या नुकसानीबाबतही राज्य सरकार सकारात्मक भूमिका घेत असल्याचेते म्हणाले.

भूमिपूजन सोहळयासाठी प्रमुख उपस्थित असलेले मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सातपाटी मत्स्यबंदराचा 350 कोटींचा महासंकल्प24 महिन्यांतपूर्ण करणार असल्याची ग्वाही देत. महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र सागरी मंडळाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पामुळे पारंपरिक मच्छीमारांना आधुनिक सुविधा, सुरक्षित नौकावाहतूक आणि आर्थिक बळकटी मिळणार असल्याचा विश्वास यावेळी राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केला.

मंत्री नितेश राणे यांनी सातपाटी बंदर प्रकल्पाला "पारंपरिक मच्छीमारांच्या आर्थिक समृद्धीचा महामार्ग" असे संबोधत. "24 महिन्यांत काम पूर्ण करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करू," अशी ग्वाही त्यांनी दिली. "वेळेत आणि दर्जेदार काम झालेच पाहिजे. कोणत्याही अधिकाऱ्याला दिरंगाई करण्याची हिंमत होणार नाही," असा घणाघाती इशाराही मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी यावेळी दिला.

मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा देण्याचा निर्णय हा ऐतिहासिक असल्याचे सांगत, मच्छीमारांना किसान क्रेडिट कार्ड, नुकसान भरपाई आणि विविध योजनांचा लाभ मिळत असल्याची माहिती दिली. "राज्याच्या मत्स्यव्यवसाय विभागाचे बजेट 212 कोटींवरून1240 कोटींवर नेण्यात आले असून मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना मच्छीमारांसाठी मोठा आधार ठरेल," असे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे म्हणाले

एलईडी मासेमारीविरोधात सरकारने कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट करताना मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे म्हणाले, "पारंपरिक मच्छीमारांच्या हिताविरुद्ध जाणाऱ्यांना सरकार पाठीशी घालणार नाही. ड्रोनच्या माध्यमातून अनधिकृत मासेमारीवर कारवाई सुरू असून हजाराहून अधिक नौकांवर कारवाई करण्यात आली आहे." मच्छीमार संस्थांनीही एलईडी मासेमारी करणाऱ्यांना डिझेल पुरवठा बंद करण्याचे आवाहन त्यांनी केले. सातपाटी खाडीत साचलेल्या गाळामुळे नौकावाहतूक आणि मासेमारीमध्ये मोठ्या अडचणी निर्माण होत होत्या. नव्या प्रकल्पाअंतर्गत बंदराचे खोलीकरण, अत्याधुनिक सुविधा, सुरक्षित जेट्टी, मासळी प्रक्रिया सुविधा आणि पर्यटनविकासाला चालना देणारी कामे हाती घेतली जाणार आहेत. त्यामुळे पालघरच्या किनारपट्टीवरील मत्स्यव्यवसाय आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला नवी गती मिळणार असल्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी शेवटी स्पष्ट केले.

# ईटकुर चे भूमिपुत्र श्री शहादेव डोबाळे यांची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी भीमराव गावडे :** ईटकुर गावचे भूमिपुत्र श्री शहादेव डोबाले यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन करत पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदावर निवड मिळवली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे ईटकुर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. जिद्द, चिकाटीच्या जोरावर यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्ती झाली आहे. २०२६ मध्ये झालेल्या सेवेअंतर्गत परीक्षेत त्यांनी हे यश संपादन केले. ते गडचिरोलीत राज्य राखीव पोलीस दलात कार्यरत होते.मूळ गावी ईटकुर येथे गावकऱ्यांनी नवनिर्वाचित पोलीस उपनिरीक्षक डोबाळे यांची वाजतगाजत मिरवणूक काढून आनंद व्यक्त केला.



ईटकुर ता.गेवराई जि.बीड येथील गावचे ते भूमिपुत्र आहेत. शहादेव डोबाळे यांनी दोन वेळा परीक्षा दिली. २०२६ मध्ये झालेल्या सेवेअंतर्गत परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. त्यामध्ये त्यांना यश मिळाले आहे. प्रगतशील शेतकरी कचरू गणपती डोबाळे यांचे ते चिरंजीव आहेत.

२०१६ पासू ते राज्य राखीव पोलीस दलात गडचिरोली येथे कार्यरत होते. आईवडीलांच्या आशीर्वादाने पोलीस उपनिरीक्षक झालो, याचा मला खुप आनंद असून, माझे स्वप्न साकार

झाल्याची भावना व्यक्त करून, गावकऱ्यांनी मला नेहमीच प्रोत्साहन दिले. चिकाटीने अभ्यास करून कोणत्याही क्षेत्रात करिअर करता येते. अशी भावना त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली. आपल्या गावातला पहिलाच मुलगा पोलीस अधिकारी झाल्याबद्दल गावकरी, नातेवाईक, मित्र, परिवाराने एकत्रयेऊन, शहादेव डोबाळे यांची वाजतगाजत भव्य मिरवणूक काढून आनंद व्यक्त केला आहे. त्यांच्या या यशाबद्दल ग्रामस्थ, मित्रपरिवार तसेच विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# समाज जागृती विद्यालयाचा एसएससी परीक्षेत ८५.८६ टक्के निकाल; विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

## आरती पांचाळ प्रथम, अक्षरा माने द्वितीय तर कृष्णा सापसोड तृतीय

**दैनिक युवक आधार**

**मुरुड | प्रतिनिधी :** समाज जागृती शिक्षण संस्था, मुरुड संचलित समाज जागृती माध्यमिक विद्यालयाने फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस. सी. बोर्ड परीक्षेत उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवत घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाचा सरासरी निकाल ८५.८६ टक्के लागला आहे.

विद्यालयातील एकूण ०८ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले असून प्रथम श्रेणीत ३२ विद्यार्थी तर द्वितीय श्रेणीत ३९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गुणानुक्रमे कु. आरती रामदास पांचाळ हिने ८८.६० टक्के गुण




मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु. अक्षरा अगतराव माने हिने ८४.०० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला, तर चि. कृष्णा विलास सापसोड याने ८२.८० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला.या यशाबद्दल समाज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. बी. एस. पटाडे (दादा), सचिव श्री. ॲड. व्ही. वाय. पाटील, संचालक मंडळ तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. कदम एस. झेड. व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# वेळास आगर येथे श्री सत्यनारायण महापूजा उत्साहात संपन्न

## मान्यवरांच्या उपस्थितीत धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

**दैनिक युवक आधार**

**वेळास आगर वार्ताहर** : वेळास आगर येथील तेली समाज भावी संस्था, वेळास आगर यांच्या वतीने सालाबादप्रमाणे यावर्षीही श्री सत्यनारायण महापूजेचे भव्य आयोजन करण्यात आले होते. भक्तीमय वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यात राजकीय, सामाजिक आणि पोलीस प्रशासनातील मान्यवरांनी उपस्थिती लावून श्रींच्या चरणी नतमस्तक झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे अध्यक्ष श्री. रवी निगडे यांनी सर्व उपस्थितांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीवर्धन पंचायत समितीचे सभापती श्री. सुचिन किर साहेब आणि दिघी सागरी पोलीस स्टेशनचे पी.एस.आय. श्री. संतोष आवटी साहेब उपस्थित होते. समाजाचे अध्यक्ष श्री. रवी निगडे यांच्या हस्ते दोन्ही मान्यवरांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. पोलीस प्रशासनाच्या कामाचा व्याप सांभाळत असतानाही पी.एस.आय. आवटी व त्यांच्या सहकाऱ्यांनी श्रद्धेपोटी दर्शनाचा लाभ घेतला, हे या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.

या धार्मिक उत्सवासोबतच विविध सांस्कृतिक व स्पर्धात्मक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महिलांसाठी विशेष कार्यक्रम तसेच भजन-कीर्तनाचे कार्यक्रम पार पडले. आयोजित करण्यात आलेल्या भजन स्पर्धेला भाविकांचा मोठा प्रतिसाद लाभला.

या मंगलमयी सोहळ्यासाठी संतोष राऊत, नितीन पवार, दीपक पवार, मुरलीधर पवार, संदीप रहाटे, संतोष रहाटे, आशिष झगडे, राकेश पवार, रवी पवार, सागर जाधव, रवी झगडे, मुकुंद राऊत, किसन रहाटे, राजू निगडे यांसह महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. ललिता शेलार, साक्षी रहाटे, दीक्षिता पवार, रुही पवार, रुपाली पवार, दिव्या पवार, निकिता पवार आणि तेली समाजातील असंख्य कार्यकर्ते, महिला मंडळ व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिवसभर चाललेल्या या कार्यक्रमात भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. भक्ती आणि सामाजिक एकोप्याच्या या वातावरणामुळे वेळास आगर परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# सव्वा कोटींच्या गुटख्यासह अमरावतीच्या ‘जावेद भाई’चा काळा साम्राज्य कोसळले!

## वाशिम महामार्ग पोलिसांचा धडाकेबाज सर्जिकल स्ट्राईक; १ कोटी ३१ लाख ५१ हजार २५० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त, पाच जिल्ह्यांत पसरलेल्या रॅकेटचा पर्दाफाश

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** :वाशिम कारंजा लाड तालुक्यातून जाणाऱ्या समृद्धी महामार्गावर सुरू असलेल्या गुटखा तस्करीच्या आंतरजिल्हा रॅकेटवर वाशिम महामार्ग पोलिसांनी अत्यंत धाडसी आणि नियोजनबद्ध कारवाई करत तब्बल १ कोटी ३१ लाख ५१ हजार २५० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला. या प्रभावी कारवाईमुळे अमरावतीतील कथित गुटखा तस्कर ‘जावेद भाई’ याचे अनेक वर्षांपासून सुरू असलेले काळे साम्राज्य उघडकीस आले असून, वाशिमसह अमरावती, यवतमाळ, अकोला आणि




वर्धा जिल्ह्यांमध्ये सक्रिय असलेल्या गुटखा नेटवर्कला जबर धक्का बसला आहे. वाशिम महामार्ग पोलिसांच्या सतर्कतेमुळे आणि कर्तव्यदक्षतेमुळे ही मोठी कारवाई शक्य झाली असून, त्यांच्या या कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

९ मेच्या रात्री गुप्त माहितीच्या आधारे कारंजा लाड टोल नाक्यावर वाशिम महामार्ग पोलिसांनी अत्यंत शिताफीने सापळा रचला. समृद्धी महामार्गावरून जाणारा आयशर ट्रक (एमएच ४० सीटी २९६४) अडवून त्याची तपासणी करण्यात आली. सुरुवातीला चालकाने उडवाउडवीची उत्तरे दिली; मात्र ट्रकमधून येणाऱ्या उग्र वासामुळे पोलिसांचा संशय बळावला. ताडपत्री हटवून पाहिले असता छतापर्यंत खच्चून भरलेल्या प्रतिबंधित गुटख्याच्या गोण्या आढळून आल्या. चौकशीच्या पहिल्याच टप्प्यात चालकाने हा माल अमरावतीतील ‘जावेद भाई’चा असल्याची माहिती दिल्याचे समजते.

सूत्रांच्या माहितीनुसार, जावेद नावाचा हा कथित तस्कर गेल्या अनेक वर्षांपासून अमरावती, यवतमाळ, वाशिम, वर्धा आणि अकोला या पाच जिल्ह्यांमध्ये गुटख्याचे मजबूत जाळे उभे करून बसला होता. विविध मार्गांचा वापर करून आणि वाहनांच्या आडून प्रतिबंधित मालाची वाहतूक केली जात असल्याची चर्चा आहे. मात्र वाशिम महामार्ग पोलिसांच्या जागरूकतेमुळे या संपूर्ण नेटवर्कचा पर्दाफाश झाला आणि गुटखा माफियांच्या अवैध साम्राज्याला मोठा हादरा बसला.या कारवाईनंतर नागरिकांमध्ये एकच चर्चा रंगली आहे—ज्या गुटखा तस्कराचे नेटवर्क पाच जिल्ह्यांत पसरले होते, त्याला रोखण्याचे मोठे काम अखेर वाशिम महामार्ग पोलिसांनी करून दाखवले. त्यांच्या या कारवाईमुळे पोलिस दलाविषयी जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. अवैध धंद्यांविरोधात कठोर भूमिका घेत, कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची क्षमता वाशिम पोलिसांनी पुन्हा सिद्ध केली आहे.

महामार्ग पोलिसांच्या या धाडसी कारवाईमुळे गुटखा तस्करीच्या जगतात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, एका रात्रीतच कोट्यवधी रुपयांच्या अवैध व्यवहाराला जबर धक्का बसला आहे. तपास जसजसा पुढे जाईल, तसतसे आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.ही उल्लेखनीय कारवाई महामार्ग पोलीस वाशिम येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीनकुमार दांदडे, पोलीस उपनिरीक्षक कृष्णकन्हैया पवार, जमादार अमोल इंगोले, जमादार आनंद काकडे आणि त्यांच्या पथकाने अत्यंत दक्षतेने पार पाडली. त्यांच्या सतर्कतेमुळे सव्वा कोटी रुपयांच्या प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक रोखण्यात यश आले असून, वाशिम महामार्ग पोलिसांची ही कारवाई राज्यभर चर्चेचा विषय ठरत आहे.

# महत्वाच्या उच्च पदावरील अधिकारीच भ्रष्टाचारात अडकत असतील तर सामान्य माणसाने न्याय कोणाकडे मागायचा..

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** आजच्या घडीला समाजासमोर उभा राहिलेला सर्वात गंभीर आणि ज्वलंत प्रश्न म्हणजे प्रशासकीय व्यवस्थेतील वाढता भ्रष्टाचार. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या बातम्यांमध्ये जिल्हाधिकारी, तहसीलदार, सहाय्यक पोलिस निरीक्षक यांसारख्या जबाबदार पदांवरील अधिकारी भ्रष्टाचाराच्या प्रकरणात अडकले असल्याचे समोर आले. हे वृत्त सामान्य नागरिकांसाठी अत्यंत धक्कादायक आहे. कारण जे अधिकारी कायदा, सुव्यवस्था आणि न्याय टिकवून ठेवण्याची जबाबदारी सांभाळतात, तेच जर भ्रष्टाचारात सहभागी होत असतील तर सामान्य माणसाने न्याय कोणाकडे मागायचा, हा प्रश्न साहजिकच निर्माण होतो.

लोकशाही व्यवस्थेचा पाया हा प्रामाणिक प्रशासनावर उभा असतो. जिल्हाधिकारी हा संपूर्ण जिल्ह्याचा प्रमुख अधिकारी मानला जातो. तहसीलदार महसूल आणि जमिनीच्या कामकाजाचा प्रमुख असतो, तर पोलिस अधिकारी कायदा व सुव्यवस्था राखण्याचे कार्य करतात. या पदांवर असणाऱ्या व्यक्तींनी जर पैशाच्या मोहापायी गैरव्यवहार सुरू केले, तर शासन यंत्रणेवरील लोकांचा विश्वास डळमळीत होतो. भ्रष्टाचारामुळे गरीब, शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांचे हक्क हिरावले जातात. एखाद्या साध्या दाखल्यासाठी, जमिनीच्या कामासाठी



किंवा पोलिस तक्रारीसाठी नागरिकांना लाच द्यावी लागते, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे.

आज अनेक नागरिकांच्या मनात असा प्रश्न निर्माण झाला आहे की, “जर अधिकारीच भ्रष्ट असतील तर न्याय कुठे मिळणार?” कारण सामान्य माणूस शासनाकडे आशेने पाहतो. त्याला वाटते की अधिकारी त्याच्या अडचणी सोडवतील, परंतु जेव्हा तेच अधिकारी भ्रष्टाचारात अडकतात तेव्हा लोकांचा विश्वास तुटतो. त्यामुळे समाजात असंतोष, नैराश्य आणि संताप वाढतो. भ्रष्टाचार हा केवळ आर्थिक गुन्हा नसून तो समाजाच्या नैतिक मूल्यांवर आघात करणारा रोग आहे. देशाच्या विकासासाठी प्रामाणिक आणि पारदर्शक प्रशासन अत्यंत आवश्यक असते. भ्रष्टाचारामुळे शासनाच्या योजना गरजूंपर्यंत पोहोचत नाहीत. रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य अशा विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर निधीचा अपव्यय होतो. परिणामी देशाचा विकास मंदावतो. एकीकडे सरकार “विकसित भारत” चे स्वप्न दाखवत असताना दुसरीकडे भ्रष्टाचाराचे प्रकार समोर येत असतील, तर विकासाची गती निश्चितच कमी होते.

मात्र या परिस्थितीत नागरिकांनी निराश होऊन चालणार नाही. समाजात आजही अनेक प्रामाणिक अधिकारी कार्यरत आहेत. भ्रष्टाचाराविरोधात लढण्यासाठी नागरिकांनी जागरूक राहणे गरजेचे आहे. माहितीचा अधिकार, लोकशाही मार्गाने आंदोलन, न्यायालयीन लढा, माध्यमांची मदत आणि भ्रष्टाचारविरोधी यंत्रणांकडे तक्रार करणे या माध्यमातून नागरिक आवाज उठवू शकतात. तसेच तरुण पिढीमध्ये प्रामाणिकपणा आणि नैतिक मूल्यांची जाणीव निर्माण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, भ्रष्टाचार हा देशाच्या प्रगतीसमोरील सर्वात मोठा अडथळा आहे. अधिकारी, राजकारणी आणि नागरिक यांनी मिळून प्रामाणिकपणे काम केले तरच देशाचा खरा विकास शक्य आहे. अन्यथा “जनतेसाठी असलेली व्यवस्था” ही केवळ कागदोपत्रीच राहील. आज जनतेसमोर उभा राहिलेला हा प्रश्न अत्यंत गंभीर असून त्यावर कठोर कारवाई आणि समाजजागृती हाच एकमेव उपाय आहे.

**दाऊ गाडगेवाड हिमायतनगर**
**पत्रकार**

# एल के इंग्लिश हायर सेकंडरी विद्यालय, आमणी (बु.) महागावचा पहिल्याच वर्षी 100 टक्के निकाल

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव :यवतमाळ** : मार्च 2026 मध्ये घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल दिनांक 8 मे 2026 रोजी जाहीर झाला. यामध्ये एल के इंग्लिश हायर सेकंडरी विद्यालय, आमणी (बु.) महागाव या विद्यालयाने पहिल्याच वर्षी शंभर टक्के निकालाची उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. विद्यालयातील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होऊन यश संपादन केले आहे. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक



प्रथम क्रमांक — समीक्षा सतीश भरवाडे (93.00 %) | द्वितीय क्रमांक — मंतव्य अर्जुन राठोड (90.40) | तृतीय क्रमांक — अथर्व नीलकंठ चौधरी (88.80)

समीक्षा सतीश भरवाडे हिने 93.00 टक्के गुण मिळवून पटकाविला. द्वितीय क्रमांक मंतव्य अर्जुन राठोड याने 90.40 टक्के गुणांसह मिळविला, तर तृतीय क्रमांक अथर्व नीलकंठ चौधरी याने 88.80 टक्के गुण मिळवून प्राप्त केला.यशस्वी विद्यार्थ्यांचे व विद्यालयाचे सर्वत्र कौतुक होत असून विद्यालय विकास संस्थापक अध्यक्ष श्री. गोविंदराव तासके साहेब, संचालक श्री. विठ्ठलराव कदम पाटील साहेब, सचिव सौ. अदिती विवेक तासके मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री. शरद वारकड सर, रवी भोणे सर, दिवाळ सर, नजरघेने सर, इंगोले सर, शिरभाते सर, शिंदे सर, गाडे सर तसेच शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# “स्वच्छतेसाठी महापौर आपल्या प्रभागात” मोहिमेंतर्गत प्रभाग १८ मधील संपूर्ण परिसराची स्वच्छता

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, प्रतिनिधी :** स्वच्छ भारत अभियानांतर्गत पनवेल महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या “स्वच्छतेसाठी महापौर आपल्या प्रभागात” या विशेष मोहिमेंतर्गत आज, दि. ९ मे रोजी प्रभाग क्रमांक १८ मध्ये अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेच्या माध्यमातून परिसराची स्वच्छता करून महापौर नितीन पाटील यांनी नागरिकांपर्यंत स्वच्छतेचा संदेश पोहोचविला. या व्यापक स्वच्छता मोहिमेत सभागृह नेते प्रकाश बिनेदार, महापालिका सदस्य सुमित झुंजारराव, स्नेहल ढमाले तसेच प्रीती जॉर्ज यांनी उपस्थित राहून स्वच्छता दूतांचा उत्साह वाढविला. तसेच पालिकेचे विभाग प्रमुख अनिल कोकरे, मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे तसेच संबंधित प्रभागांतील स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.मोहिमेदरम्यान प्रभाग १८ मधील विविध महत्त्वाच्या ठिकाणांसह अंतर्गत रस्ते व गल्ल्यांची सखोल स्वच्छता करण्यात आली. यामध्ये पालिका मैदान परिसर, देवाळे तलाव, महात्मा गांधी उद्यान परिसर, भुसार मोहल्ला, मांडावकर वाडा, जय भारत नाका परिसर, ठाणा नाका रोड तसेच वाल्मिकी नगर रोड या परिसरांचा समावेश होता.या मोहिमेत प्रभाग क्रमांक १४ ते २० मधील सुमारे २०० स्वच्छता दूत, पर्यवेक्षक तसेच घंटागाडी विभागातील कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. सर्व कर्मचाऱ्यांच्या समन्वयातून संपूर्ण प्रभागात एकाच वेळी स्वच्छता उपक्रम राबविण्यात आल्याने मोहिमेला अधिक वेग व परिणामकारकता प्राप्त झाली.या मोहिमेत साफसफाईबरोबरच विविध पूरक उपाययोजनांवरही विशेष भर देण्यात आला.पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नाल्यांमधील कचरा काढून पाणी निचरा सुरळीत राहावा यासाठी नाला साफसफाई करण्यात आली. तसेच नागरिकांना ओला व सुका कचरा वेगळा करण्याबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले. डासांच्या प्रादुर्भावाला आळा घालण्यासाठी संपूर्ण परिसरात जंतुनाशक धूर फवारणी (फॉगिंग) करण्यात आली.या उपक्रमादरम्यान महापौर नितीन पाटील यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून कामाची पाहणी केली.“स्वच्छ पनवेल – सुंदर पनवेल” हे ध्येय साकार करण्यासाठी नागरिकांनीही स्वच्छता उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# वाढदिवसाचा सामाजिक संदेश” — पत्रकार अमोल पाटील यांचे सदानंद वृद्धाश्रमात अन्नदान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल :वार्ताहर :** समाजाप्रती असलेली संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस साजरा करण्याचा प्रेरणादायी उपक्रम दैनिक झुंजार आवाजचे उपसंपादक तथा धगधगती मुंबईचे प्रतिनिधी पत्रकार अमोल पाटील यांनी राबविला. आपल्या वाढदिवसानिमित्त त्यांनी सदानंद वृद्धाश्रम येथे अन्नदान करत ज्येष्ठ नागरिकांसोबत आनंदाचे आणि आपुलकीचे क्षण वाटले.

आजच्या धकाधकीच्या आणि दिखाऊपणाकडे झुकणाऱ्या काळात वाढदिवस मोठ्या जल्लोषात साजरे करण्याची पद्धत वाढत असताना, पत्रकार अमोल पाटील यांनी मात्र सामाजिक जाणीव जपत वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसोबत वेळ घालवून एक वेगळा आदर्श समाजासमोर ठेवला. “वाढदिवस हा केवळ केक कापून किंवा उत्सव साजरा करण्यापुरता मर्यादित नसून समाजातील गरजू आणि ज्येष्ठांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करण्याचा दिवस असावा,” असा सकारात्मक संदेश या उपक्रमातून देण्यात आला.



सदानंद वृद्धाश्रम येथे आयोजित करण्यात आलेल्या या अन्नदान कार्यक्रमात वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना प्रेमपूर्वक भोजन देण्यात आले. यावेळी अनेक ज्येष्ठ नागरिकांनी अमोल पाटील यांच्याशी संवाद साधत आपल्या भावना व्यक्त केल्या. काहींनी त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत मनःपूर्वक आशीर्वाद दिले. वृद्धाश्रम परिसरात भावनिक आणि आनंददायी वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी बोलताना पत्रकार अमोल पाटील म्हणाले, “माझ्या वाढदिवसानिमित्त सदानंद वृद्धाश्रमामध्ये अन्नदान करण्याची संधी मिळाली, हे माझ्यासाठी खऱ्या अर्थाने समाधान आणि आशीर्वादाचे क्षण ठरले. ज्येष्ठांच्या सहवासात वाढदिवस साजरा करताना मनाला वेगळाच आनंद मिळाला. समाजातील ज्येष्ठांचे आशीर्वाद हेच माझ्यासाठी सर्वात मोठे बळ आहे. भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांमध्ये सातत्याने सहभागी राहण्याचा माझा प्रयत्न राहील.”

या उपक्रमामुळे वाढदिवस साजरा करण्याच्या संकल्पनेला सामाजिक जाणिवेची आणि मानवतेची जोड मिळाल्याचे उपस्थितांनी सांगितले. समाजातील प्रत्येकाने आपले आनंदाचे क्षण गरजू, निराधार आणि ज्येष्ठ नागरिकांसोबत वाटून घेतल्यास समाजात सकारात्मक बदल घडू शकतो, असे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.

पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असताना सामाजिक भान जपत विविध उपक्रमांत सक्रिय सहभाग घेणाऱ्या अमोल पाटील यांच्या या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे. सामाजिक उत्तरदायित्व जपत वाढदिवसाचे औचित्य साधून करण्यात आलेल्या या अन्नदान उपक्रमामुळे अनेकांनी समाधान व्यक्त करत अभिनंदन केले.


# तांत्रिक अडचणींचा गैरसमज”; उरण जमीन प्रकरणावर तेजस डाकी यांचे स्पष्टीकरण

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** उरण तालुक्यातील विंधणे, वशेणी आणि पुनाडे गावांमध्ये प्लॉट खरेदी-विक्री व्यवहारातून उभ्या राहिलेल्या वादाला आता कायदेशीर वळण मिळाले असून, लँडलोर्ड्स रिअल्टर्स कंपनीविरोधात सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्यात ४ मे रोजी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे समाजसेवक, उद्योजक तथा विकासक तेजस डाकी यांच्या नावाची परिसरात मोठी चर्चा सुरू झाली आहे.

१४ गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याचा आरोप करत संबंधितांनी तक्रार दाखल केली असून, व्यवहारातील विलंब, सर्व्हेतील अडचणी, प्लॉटचे ठिकाण, क्षेत्रफळ आणि सौद्यातील तफावत, यामुळे समाधान न झाल्याने काही गुंतवणूकदारांनी अखेर कायदेशीर मार्ग अवलंबला व अनेकांनी व्यवहारीक नियोजनात आपली भागेदारी कायम ठेवत विश्वासाने साथ दिली असल्याचे सांगण्यात आले. मेसर्स लँडलोर्ड्स रिअल्टर्स कंपनीतील काही सदस्यांविरोधातही यावेळी तक्रार नोंदवण्यात आल्याने होणारी चर्चा अपूर्ण असून त्याने काही काळ गैरसमज होईल पण अनेक वर्षाच आमच विश्वासच नात कायम असेल अशी भावना डाकी परिवाराने व्यक्त केली.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणावर विकासक



तेजस डाकी यांनी आपली भूमिका स्पष्ट करत आरोप फेटाळले आहेत." न्याय व्यवस्थेवर विश्वास असून विकासक म्हणून काही तांत्रिक अडचणी आणि प्रक्रिया गैरसमजातून चुकीच्या पद्धतीने मांडण्यात आल्या. अपूर्ण व्यवहाराला घाईघाईत कायदेशीर स्वरूप देण्यात आले,” असे त्यांनी सांगितले.

तसेच, “निवेशकांचे समाधान करणे हे आमचे कर्तव्य आहे. न्यायालयीन प्रक्रियेत वस्तुस्थिती आणि सत्य लवकरच स्पष्ट होईल,” असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

सध्या या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस प्रशासनाकडून सुरू असून, पुढील काळात या प्रकरणाला कोणते वळण मिळते याकडे गुंतवणूकदारांसह संपूर्ण उरण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# महार वतन जमिनी घोटाळ्याविरोधात शेतकरी आक्रमक; आझाद मैदानात आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : महार वतन जमिनीच्या व्यवहारात मोठ्या प्रमाणावर फसवणूक झाल्याचा गंभीर आरोप करीत राज्यभरातील शेतकरी आता आक्रमक झाले आहेत. आपल्या हक्काच्या जमिनी बळकावल्या गेल्याचा दावा करत संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी करण्यासाठी शेतकरी लवकरच मुंबईतील आझाद मैदान येथे आंदोलन करणार आहेत. शासन आणि महसूल विभागाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत, न्याय मिळाला नाही तर आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही आंदोलकांनी दिला आहे.

किवळे, ता. हवेली. जि.पुणे येथील शेतकरी विजय गायकवाड यांनी महारवतन जमीनीबाबत फसवणूक झाल्याचा आरोप करीत १२ मे पासून आझाद मैदान येथे आंदोलन करणार असल्याचे निवेदन महसुलमंत्री, नगरविकास मंत्री, महसुल सचिव यांना दिले आहे.

किवळे येथील विजय गायकवाड यांच्या महारवतनाच्या जमीनीबाबत निवृत्त पोलीस अधिकारी विक्रम बोके,त्यांची पत्नी विभा बोके तसेच गिन्नी सिटी कॉर्पचे गौतम हरलालका यांनी कुलमुखत्यारपत्र बनवून अज्ञानाचा फायदा घेऊन गैरकृत्ये करून मोठी आर्थिक फसवणूक केली.महारवतनाची जमीन नियमाकुल करण्यासाठी अधिकारी यांच्यावर दबाव आणला,प्लॉटींग करून अटी व शर्थींचा भंग झालेला असतानाही शासन मुग गिळून गप्प आहे असे गायकवाड यांनी सांगितले.

माजी आयपीएस अधिकारी विक्रम नरेंद्र बोके आणि उद्योगपती गौतम विनोद हरलालका यांनी महार वतनाची जमीन खोट्या दस्तऐवजाद्वारे बेकायदेशीरपणे बळकावून अधिकाऱ्यांशी संगनमत करून परवानगीचे आदेश मिळवून कायद्याला काळीमा फासल्याने संबधित जमीन तातडीने सरकारजमा करावी अशी मागणी विजय गायकवाड यांनी केली आहे.

जिल्हाधिकारी पुणे यांनी बोके व हरलालका यांना जमीन विकसनासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिले असून ते रद्द करण्याची मागणी करूनही दखल घेतली जात नाही. महार वतनाची जमीन असताना व अटी,शर्थींचा भंग झालेला असुनही प्रशासनाने दखल घेतली नाही.

खेडचे आमदार बाबाजी काळे यांनी मागील वर्षी सदर प्रकरणी अधिवेशनात लक्षवेधीची सुचना दिली,म्हणून विक्रम बोके यांनी त्यांना फोन करून दबाव आणल्याने आमदार बाबाजी काळे यांनी मुख्यमंत्री व विधानसभा अध्यक्ष यांच्याकडे लेखी तक्रार केली होते असे गायकवाड यांनी नमुद केले आहे.

जिल्हाधिकारी पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका यांनी विकसनासाठी दिलेल्या परवानग्या, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १५५ चा गैरवापर करून सात बारा उताऱ्यावरून कमी केलेले क्षेत्र,उपअधिक्षक भुमी-अभिलेख हवेली यांनी केलेली बेकायदेशीर फाळणी,तसेच बोके व हरलालका यांनी महारवतनाची जमीन विकसित करीत असताना बेकायदेशीरपणे ताबा घेतला, मोबदला न देता फसवणूक करून मोठा गृहप्रकल्प उभारून शासनाचे सर्व नियमांना हरताळ फासला आहे.

# टेकवारी २.०: प्रशासनाला नाविन्यपूर्णतेचा ध्यास!

महाराष्ट्राचे प्रशासकीय मुख्यालय असलेल्या मंत्रालयाने ४ ते ८ मे २०२६ या पाच दिवसांच्या कालावधीत एका सरकारी कार्यालयापलीकडे जाऊन एक वेगळेच स्थित्यंतर अनुभवले. या कालावधीत आयोजित टेकवारी २.० उपक्रम हा प्रशिक्षण, सहयोग आणि ऋणानुबंधाचा एक अनोखा प्रयोग ठरला. जिथे तंत्रज्ञान शासनाला भेटले, आरोग्य प्रशासनाशी जोडले गेले आणि संस्कृतीने नवकल्पनेशी सुंदर सोबत केली!

शासनात आपण अनेकदा व्यवस्था, धोरण आणि प्रक्रियांबद्दल बोलतो. परंतु, टेकवारी २.० ने लोक, त्यांची मने, त्यांची मूल्ये, त्यांचे आरोग्य, त्यांची सर्जनशीलता आणि बदलत्या जगाशी जुळवून घेण्याची त्यांची इच्छाशक्ती याबद्दलच प्रशासन अंतिमतः कार्यरत असते, याची जाणीव करून दिली.

महाराष्ट्राच्या 'वारी' परंपरेतून प्रेरणा घेऊन, जिथे हजारो मंडळी भक्ती, शिस्त आणि ध्येयाने पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करतात, टेकवारीने तीच भावना प्रशासनात आणली आणि त्यातून हा 'लर्निंग वीक' (शिक्षण सप्ताह) नवविचारांची आधुनिक 'यात्रा' ठरला.

टेकवारी २.० चे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील समतोल. हा केवळ आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (AI) किंवा डिजिटल प्रशासनावरील उपक्रम नव्हता. त्याची रचना एक सर्वांगीण शिक्षण चळवळ म्हणून करण्यात आली होती. यामध्ये सायबर सुरक्षा, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि इंडिया स्टॅकपासून ते योगासने, तणाव व्यवस्थापन, पालकत्व आणि प्रशासनातील नैतिकता अशा विविध विषयांवरील सत्रांचा समावेश होता.

टेकवारी २.० मध्ये एका हॉलमध्ये अधिकारी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि AI-आधारित प्रशासनाच्या भविष्यावर चर्चा करत होते, तर दुसऱ्या हॉलमध्ये सहभागी मानसिक स्वास्थ्य, निकोप जीवन आणि भावनिक संतुलनाबद्दल शिकत होते. टेकवारी २.० मध्ये नाविन्यपूर्ण संकल्पना, आरोग्यदायी अन्न आणि पोषण दर्शविणारी प्रदर्शने देखील होती. या साऱ्यांमुळे मंत्रालयाचे 'त्रिमूर्ती प्रांगण' विविध सांस्कृतिक सादरीकरणांनी, लय आणि ऊर्जेने भरून गेले होते.

भविष्यासाठी सज्ज असलेले प्रशासन केवळ तंत्रज्ञानावर उभारता येत नाही. त्यात सहानुभूती, आरोग्य, नैतिकता आणि सर्जनशीलता देखील अंतर्भूत असावी लागते. टेकवारीचे खरोखर लक्षणीय वैशिष्ट्य म्हणजे त्याची व्याप्ती आणि सर्वसमावेशकता. मंत्रालयात ६,००० हून अधिक कर्मचाऱ्यांनी या उपक्रमात प्रत्यक्ष सहभाग घेतला, तर जिल्ह्या-जिल्ह्यांमधून लाखो कर्मचारी 'लाइव्ह स्ट्रीमिंग'द्वारे जोडले गेले. शिक्षणाच्या प्रवासात कोणताही कर्मचारी मागे राहू नये, ही साधी पण प्रभावी कल्पना त्यामागे होती.

निलेश परब आणि त्यांच्या टीमने सादर केलेले 'तालरंग' हे लयबद्ध उद्घाटन सादरीकरण खूप सुंदर वेगळेपणाने सादर झाले . प्रारंभी एक संगीत सादरीकरण वाटणारे नंतर प्रशासनाचे रूपक बनले. प्रत्येक वाद्याची एक भूमिका होती. प्रत्येक ताल समन्वयावर अवलंबून होता. प्रत्येक आवाजाप्रमाणेच प्रत्येक विरामालाही महत्त्व होते.

अधिकारी, कर्मचारी आणि मान्यवरांनी हे समन्वयित सादरीकरण पाहिले तेव्हा त्यातील संदेश उलगडला. प्रशासन हे देखील एका ऑर्केस्ट्रासारखे (वाद्यवृंद) आहे. विविध विभाग, अधिकारी, संस्था आणि नागरिक यांच्यात सुसंवाद आणि समन्वय असल्याशिवाय सुशासन अशक्य आहे.

माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मुख्य सचिव यांच्यासह वरिष्ठ नेतृत्वाच्या सहभागाने शिक्षण आणि स्वीकार (Adaptation) ही प्रशासनाच्या प्रत्येक स्तरावरील सामायिक जबाबदारी असल्याची कल्पना अधिक दृढ केली.



या सप्ताहाने तंत्रज्ञान क्षेत्रातील नेते, प्रशासक, आरोग्य तज्ज्ञ, कलाकार आणि प्रशिक्षकांना एकत्र आणले. एआय, सायबर सुरक्षा, DPDP कायदा २०२३, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि डिजिटल प्रशासनावरील सत्रांनी प्रशासकीय परीघ किती वेगाने विस्तारित आहे हे प्रतिबिंबित केले. तर नैतिकता, नेतृत्व, टीकेस तोंड देणे आणि तणाव व्यवस्थापन यावरील चर्चांनी त्याला अर्थ प्राप्त करून दिला.

आज प्रशासकांकडून केवळ फाईल्स आणि धोरणे याबाबतच काम करण्याची अपेक्षा नाही, तर जनतेच्या अपेक्षा, डिजिटल परिवर्तन आणि भावनिक दडपण सांभाळण्याचीही अपेक्षा आहे. टेकवारीने ही वस्तुस्थिती प्रामाणिकपणे आणि संवेदनशीलतेने स्वीकारली.

कॅपॅसिटी बिल्डिंग कमिशन, यशदा (YASHADA), द योग इन्स्टिट्यूट, मनशक्ती, नॅसकॉम (NASSCOM) यांसारख्या संस्थांमधील तज्ज्ञ आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील धुरिणांच्या उपस्थितीने या उपक्रमाला एक उंची प्राप्त झाली.

टेकवारीचा सर्वात सुंदर पैलू म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आत्म्याशी जोडलेले त्याचे घट्ट नाते. 'नादरंग' आणि 'योगरंग' पासून 'कलारंग' आणि वारी संस्कृतीच्या अंतिम चित्रणापर्यंत, प्रत्येक संध्याकाळ ही आठवण करून देत होती की प्रगती म्हणजे परंपरांचा त्याग करणे नव्हे.

कला, एआय आणि प्रशासन यांवरील संवादांनी हा समतोल सुंदरपणे साधला. कलाकार, चित्रपट निर्माते आणि सर्जनशील मनांनी तंत्रज्ञान हे कल्पनाशक्ती आणि सांस्कृतिक ओळखीसह कसे बहरु शकते, याचा मनोज्ञ शोध घेतला.

ज्या काळात तंत्रज्ञानावरील चर्चा अनेकदा कोरड्या आणि यांत्रिक वाटतात, तिथे टेकवारीने नाविन्याला एक जिवंत मानवी चेहरा दिला. टेकवारी २.० हे केवळ सत्रांचे वेळापत्रक नव्हते. ते असे वातावरण होते जिथे अधिकारी शिकण्यासाठी थांबले; जिथे तंत्रज्ञानावर निर्भयतेने चर्चा झाली; जिथे आरोग्याला पर्यायी नव्हे तर अत्यावश्यक मानले गेले आणि जिथे प्रशासनाच्या केंद्रस्थानी संस्कृतीचा उत्सव साजरा झाला. या साऱ्यातून काही दिवसांसाठी मंत्रालय ही केवळ प्रशासकीय इमारत न राहता 'कुतूहलाचा परिसर' (Campus of Curiosity) बनली.

हा उपक्रम 'महा-साधना सप्ताहा'च्या माध्यमातून सुरू असलेल्या एका मोठ्या परिवर्तनाच्या प्रवासाचे प्रतिबिंब होता, जिथे नऊ लाख कर्मचाऱ्यांनी 'iGOT कर्मयोगी' प्लॅटफॉर्मवर संरचित शिक्षण पूर्ण केले आणि केवळ एका आठवड्यात ३५ लाख लर्निंग अवर्सची (शिकण्याच्या तासांची) विक्रमी नोंद केली. ही केवळ आकडेवारी नसून, शासन आणि त्याचे नेतृत्व आपल्या लोकांमध्ये जाणीवपूर्वक गुंतवणूक करत असल्याचे दर्शवते.

टेकवारीने अनेक प्रशासकीय सुधारणा आणि मानव संसाधन उपक्रमांवरही प्रकाश टाकला:

- MAHA eHRMS: महाराष्ट्राचे पहिले एकत्रित HR प्लॅटफॉर्म
- अनुकंपा नियुक्ती सुधारणा
- Small Bite, Big Leap सारखे छोटे डिजिटल शिक्षण उपक्रम
- सेवाकर्म आणि प्रशासन सुधारणा कार्यक्रम
- जलद आणि पारदर्शक प्रशासनासाठी भरती आणि सेवा नियमांमधील सुधारणा

टेकवारी २.० चे कदाचित सर्वात मोठे यश हे आहे की, त्याने आपल्याला आठवण करून दिली की शिक्षण कधीही संपत नाही, विशेषतः सार्वजनिक सेवेत. भविष्यातील प्रशासन केवळ अधिकार असलेल्यांचे नसेल, तर जे शिकण्यासाठी, जुळवून घेण्यासाठी, सहयोग करण्यासाठी आणि मानवी मूल्यांशी जोडलेले राहण्यासाठी तयार आहेत, त्यांचे असेल.

तुझे नाव ओठी, तुझे रूप ध्यानी
जिवाला तुझी आस गा लागली
जरी बाप साऱ्या जगाचा परि तू
आम्हा लेकरांची विठू माऊली...
माऊली माऊली, माऊली माऊली
माऊली माऊली, रूप तुझे..."

हृदयात असलेली हीच भावना नेतृत्वाला सत्तेच्या माध्यमातून सहानुभूतीच्या भावनेत रूपांतरित करते. 'बाप' हा व्यवस्थेतील अधिकार, नियम आणि प्रशासनासाठी आवश्यक असलेल्या वस्तुनिष्ठ न्यायाचे प्रतिनिधित्व करतो, तर 'माऊली' ही सहानुभूती आणि सुलभतेचे प्रतिनिधित्व करते जी प्रशासनाला 'आत्मा' देते. सेवेत खरी उत्कृष्टता तेव्हाच येते जेव्हा एखादा प्रशासक आपल्या पदाच्या पलीकडे जाऊन एक 'कल्याणकारी पालक' होतो; हे सिद्ध करतो की सर्वात प्रभावी शासन हे दूरस्थ आदेशांद्वारे नाही, तर प्रत्येक नागरिकाच्या कल्याणासाठी असलेल्या पालनपोषण करणाऱ्या बांधिलकीतून जाणवत असते.

सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती व्ही. राधा (IAS) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेला 'टेकवारी २.०'चा उपक्रम महाराष्ट्र भविष्यासाठी सज्ज आहे आणि प्रशासन हे संस्कृती व करुणेशी असलेली नाळ कायम ठेवून शिकू शकते, विकसित होऊ शकते आणि नाविन्य आणू शकते, हा दिशादर्शक विचार रुजविण्यात खरोखरच यशस्वी ठरला!

**श्रीमती आर. विमला**

# आंब्याचं लोणचं जास्त दिवस टिकवायचंय? मग 'हे' उपाय ठरतील फायदेशीर

भारतीय जेवणात लोणच्याला विशेष स्थान आहे. साध्या जेवणालाही लोणच्यामुळे वेगळी चव मिळते. पराठा, पुलाव, चिल्ला किंवा रोजच्या जेवणासोबत लोणचं असलं की जेवण अधिक रुचकर वाटतं. बाजारात विविध प्रकारची लोणची सहज मिळतात, मात्र उन्हाळ्यात बनवलं जाणारं आंब्याचं लोणचं आजही अनेक घरांमध्ये खास आवडीने तयार केलं जातं. योग्य पद्धतीने बनवल्यास हे लोणचं वर्षानुवर्षे टिकू शकतं. मात्र त्यासाठी योग्य आंबा निवडणं आणि काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवणं गरजेचं असतं.

**लोणच्यासाठी योग्य आंबा कसा निवडावा?**

आंब्याचं लोणचं चविष्ट होण्यासाठी योग्य प्रकारचा आंबा निवडणं खूप महत्त्वाचं आहे. तोतापुरी, रामकेला आणि राजापुरी हे आंबे लोणच्यासाठी उत्तम मानले जातात. या आंब्यांचा गर घट्ट आणि कमी तंतुमय असतो. त्यांची नैसर्गिक आंबट चव मसाल्यासोबत छान मिसळते. खूप मऊ वाटणारे किंवा पिवळे डाग असलेले आंबे घेणं टाळावं. असे आंबे लवकर खराब होण्याची शक्यता असते.

**आंबा घेताना 'या' गोष्टी तपासा**

आंबा हाताने हलकेच दाबून पाहा. खूप घट्ट आंबे लोणच्यासाठी योग्य असतात.

देठाजवळ कुठे रस गळत नाही ना किंवा वास येत नाही ना, हे तपासा.

आंब्याची साल गडद हिरवी आणि गुळगुळीत असावी.



कापलेले, तडे गेलेले किंवा डाग असलेले आंबे घेऊ नयेत. त्यामुळे बुरशी येण्याचा धोका वाढतो.

**लोणचं बनवताना ओलावा टाळा**

आंबे नीट धुवून स्वच्छ कापडाने पुसून घ्या. त्यानंतर ते पूर्णपणे कोरडे होऊ द्या. शक्य असल्यास उन्हात किंवा फॅनखाली वाळवा. थोडाही ओलावा राहिला तरी लोणचं लवकर खराब होऊ शकतं.

**मोहरीचं तेल वापरताना घ्या काळजी**

भारतीय लोणच्यांमध्ये पारंपरिक पद्धतीने मोहरीचं तेल वापरलं जातं. तेल आधी चांगलं गरम करून घ्यावं. त्याला थोडासा धूर येऊ द्यावा आणि नंतर पूर्ण थंड झाल्यावरच लोणच्यात वापरावं. त्यामुळे तेलाचा कच्चा वास कमी होतो.

**मीठ आणि हळद का महत्त्वाची?**

आंब्याचे तुकडे मीठ आणि हळद लावून १ ते २ दिवस उन्हात ठेवावेत. यामुळे अतिरिक्त ओलावा निघून जातो आणि लोणचं अधिक काळ टिकण्यास मदत होते.

**लोणचं साठवताना काळजी घ्या**

लोणचं नेहमी स्वच्छ आणि कोरड्या काचेच्या किंवा मातीच्या बरणीतच ठेवावं. बरणी वापरण्यापूर्वी ती उन्हात चांगली वाळवणं महत्त्वाचं आहे.

**तेलात पूर्ण बुडालेलं असावं लोणचं**

लोणचं नेहमी तेलात पूर्ण बुडालेलं असणं गरजेचं आहे. तेल नैसर्गिक प्रिझर्वेटिव्हचं काम करतं आणि लोणचं खराब होण्यापासून वाचवतं.

योग्य आंबा निवडण्यापासून ते साठवणुकीपर्यंत प्रत्येक गोष्ट काळजीपूर्वक केली, तर घरचं आंब्याचं लोणचं अधिक चविष्ट आणि टिकाऊ बनू शकतं.